दैनिक
जनप्रभात
सामाजिक परिवर्तनाचा बुलंद आवाज
मुख्य संपादक :- राहुल गजरे
कार्यकारी संपादक :- अवधूत शेंद्रे
✻ (आष्टी) वर्धा ✻ मंगळवार, दि.२० मे २०२५ ✻ वर्ष ३ रे ✻ अंक २०५ ✻ पृष्ठ ६ ✻ मुल्य ५.०० RNI NO : MAHAR/2020/82242

पर्यटकांनी 'छत्रपती शिवाजी महाराज सर्किट' द्वारे ऐतिहासिक पर्यटनाचा लाभ घ्यावा-विभागीय आयुक्त डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार

पुणे : भारतीय रेल्वे खानपान व पर्यटन महामंडळाने (आयआरटीसीटी) ऐतिहासिक व सांस्कृतिक वारशाला उजाळा देण्यासाठी आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनकार्याचा परिचय करून देण्यासाठी 'छत्रपती शिवाजी महाराज सर्किट' या एका विशेष रेल्वेची घोषणा केली आहे. ही यात्रा 'भारत गौरव टुरिस्ट ट्रेन' अंतर्गत ९ जून २०२५ पासून सुरू होत आहे. या सहलीद्वारे महाराष्ट्रातील विविध ऐतिहासिक, धार्मिक व सांस्कृतिक महत्त्व असलेल्या ठिकाणांचा पर्यटकांनी अनुभव घ्यावा, असे आवाहन विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी केले आहे. या ५ दिवसांच्या विशेष प्रवासात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनाशी संबंधित महत्त्वाच्या ऐतिहासिक स्थळांना भेट, इतिहासावर आधारीत कार्यक्रम असणार आहेत. भारत गौरव ट्रेनच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या तेजस्वी इतिहासाशी निगडीत धार्मिक आणि ऐतिहासिक स्थळांना व्यापक प्रसिद्धी मिळवून देण्याचा महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचा मानस आहे. याबाबत पर्यटनमंत्री शंभूराज देसाई व राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांच्या नेतृत्वाखाली हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

श्री क्षेत्र परळी वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकासासाठी सर्वतोपरी सहकार्य : उपमुख्यमंत्री अजित पवार

वृत्तसंस्था ■ बीड

उपमुख्यमंत्र्यांकडून प्रभू वैद्यनाथाचे दर्शन; परळी औष्णिक विद्युत केंद्राचा आढावा



बीड : उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी आज बारा ज्योर्तिलिंगापैकी एक प्रभू वैद्यनाथाचे दर्शन घेऊन विधिवत पूजा केली. तसेच मंदिर परिसरात सुरू असलेल्या विकास आराखड्यातील कामांची पाहणीही त्यांनी केली. त्यानंतर शासकीय विश्रामगृह येथे आढावा बैठक घेतली. श्री क्षेत्र परळी वैद्यनाथ ज्योर्तिलिंग तीर्थक्षेत्र विकास आराखड्यासाठी विकास आराखड्यातील कामांसाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही असे सांगून संबंधित कामे दर्जेदार व गुणवत्तापूर्ण झाली पाहिजेत असे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

यावेळी पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, आमदार धनंजय मुंडे, आमदार विक्रम काळे, उपमुख्यमंत्री कार्यालयाचे सचिव राजेश देशमुख, बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन आदी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री पवार म्हणाले की, प्रभु वैद्यनाथाच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना दर्जेदार सुविधा देण्यासाठी विकास आराखड्यातील कामेही दर्जेदार होणे अत्यंत आवश्यक आहे. कामाच्या गुणवत्तेबाबत प्रत्येकाने बारकाईने लक्ष घालणे आवश्यक आहे. मंदिर परिसरातील स्वच्छता, निटनेटके पणा, सर्व सोयी सुविधांयुक्त दर्शन मंडप, तसेच तीर्थक्षेत्र बालाजी, शिर्डी तसेच पंढरपूरच्या धर्तीवर भविष्यात भाविकांना सर्व सोयी-सुविधा देण्यासाठी राज्य शासनाकडून निधीची कमतरता पडू दिली जाणार नाही. राज्य शासन सर्वतोपरी सहकार्य करेल, असे त्यांनी सांगितले.

मंदिराच्या मागील बाजूच्या जागेवर लाईट आणि साऊंड शो करण्यात येणार आहे. लेझर शो करताना किती वेळ शो असेल, त्यामध्ये भाविकांना कोणत्या बाबी दाखविल्या जातील, यासह देण्यात येणाऱ्या सेवा सुविधा दर्जेदार असायला हव्यात असे त्यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी श्री क्षेत्र परळी येथील तीर्थक्षेत्र विकास आराखड्यामध्ये ९२ कामांना नव्याने प्रशासकीय मान्यता देण्यात आल्याचे सांगितले. यावेळी आराखड्यानुसार करण्यात येणाऱ्या कामांचे सादरीकरण करण्यात आले. तीर्थक्षेत्र विकास आराखड्यात २८६.६८ कोटीच्या विविध ९२ कामांना मान्यता दिल्याचे त्यांनी सांगितले.

दर्शन मंडपाचे काम, परिसर सुधारणा, मंदिरा भोवती दगडी फरशी, वास्तुशिल्प प्रवेशद्वार, अंतर्गत विद्युतीकरण, सौर दिवे बसविणे, उद्यान विकसित करणे, संरक्षण भिंतीचे बांधकाम, वाहनतळ यासह सुरू असलेल्या विकास कामांबाबत मुख्य वास्तुविशारद कृष्णकुमार बांगड यांनी माहिती दिली.

परळी औष्णिक विद्युत केंद्राचा उपमुख्यमंत्र्यांकडून आढावा

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज परळी औष्णिक विद्युत केंद्राअंतर्गत सुरू असलेल्या कामाचा आढावा घेतला. शासकीय विश्रामगृह येथील आढावा बैठकीस पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, आमदार धनंजय मुंडे, आमदार विक्रम काळे आदी उपस्थित होते.

यावेळी औष्णिक विद्युत केंद्राचे मुख्य अभियंता सुनील इंगळे यांनी सादरीकरणाद्वारे औष्णिक विद्युत केंद्राबाबत माहिती दिली. यामध्ये प्रस्तावित संच क्रमांक-१ ची मंजुरी व उभारणी, सौर ऊर्जा प्रकल्प मान्यता, राखेचे प्रदूषण व उपाययोजना, औष्णिक विद्युत केंद्राच्या विश्रामगृहाचे नुतनीकरण, थर्मल परिसरात स्वतंत्र पोलीस ठाणे, थर्मल कॉलनी परिसरात वृक्ष लागवड, सौर ऊर्जा प्रकल्प, आदी विषयांबाबत आढावा घेण्यात आला. परळी औष्णिक विद्युत केंद्राबाबत असलेल्या अडचणी सोडविण्यासाठी आपले सहकार्य असेल असे पवार यांनी सांगितले. यावेळी उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर, तहसिलदार व्यंकटेश मुंडे, नगर परिषदेचे मुख्याधिकारी त्रिंबक कांबळे आदी उपस्थित होते.

सर्व सामन्यांच्या कामांना तात्काळ प्राधान्य द्या : पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे अधिकाऱ्यांना निर्देश

नागपूर ■ दिलीप येवले



नागपूर : ज्या संवेदनेने शासन तळागाळातील सर्वसामान्यांपासून समाजातील सर्व घटकासाठी योजना आखते, शासन निर्णय काढते, लोककल्याणकारी राज्याच्या भूमिकेतून मदतीसाठी तत्पर राहते ती तत्परता प्रशासनाच्या माध्यमातून प्रत्ययास आली पाहिजे. लोकांचे प्रश्न त्या त्या स्थानिक पातळीवर, संबंधित कार्यालयाद्वारे त्वरीत मार्गी लागली तर जनसंवादाला लोकांना यायची वेळ पडणार नाही या शब्दात महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आपल्या उद्विग्न भावना व्यक्त केल्या. शासन स्तरावरील नागरिकांच्या समस्या आणि त्यांचे प्रश्न मार्गी लावावेत या उद्देशाने नियोजन भवन येथे आयोजित करण्यात आलेल्या जनसंवाद कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी जिल्ह्यातील सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.

लोकांची कामे तात्काळ व्हावी ही अपेक्षा चुकीची नाही. प्रत्येक नागरिकांचे शासनाशी सदैव काम पडते असेही नाही. अनेक शेतकरी नैसर्गिक आव्हानाशी तोंड देत झालेले नुकसान त्याला सोसता यावे. यात काही मदत मिळावी म्हणून शासनाकडे येतात. तहसील कार्यालयाशी संपर्क साधतात. नियमात असणारी कामे तात्काळ मार्गी लागलीच पाहिजेत. यात दिरंगाई होता काम नये असे त्यांनी सांगितले. जनसंवादात आलेली निवेदने ज्या अधिकारी व कार्यालयांना निर्देशित केली आहेत त्याबाबत संबंधितांनी पुन्हा विचारणा केल्यास कठोर कार्यवाही करू असे ते म्हणाले.

या जनसंवाद कार्यक्रमात नागरिकांनी पांदन रस्ते, शेतजमिनीवरील अतिक्रमण, घरकुल योजना, पाणी समस्या, आरोग्य ,समस्या, क्रीडा, सांस्कृतिक, धार्मिक, आध्यात्मिक व महसूल संबंधित अशा अनेक विषयांवर निवेदने देवून पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याशी संवाद साधला.

चेंबूरच्या श्री नारायण मंदिर समितीचे शैक्षणिक कार्य कौतुकास्पद : राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई : चेंबूर येथे गेल्या ६१ वर्षांपासून शैक्षणिक कार्य करीत असलेल्या श्री नारायण मंदिर समितीचे सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याचे कार्य कौतुकास्पद आहे. विद्यार्थ्यांना शिक्षित करणाऱ्या अशा संस्थांची समाजाला अधिक गरज आहे, असे प्रतिपादन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी केले.

राज्यपालांच्या उपस्थितीत चेंबूर येथील श्री नारायण मंदिर समिती या सामाजिक शैक्षणिक संस्थेचा ६१ वा वर्धापन दिन पार पडला, त्यावेळी राज्यपाल बोलत होते. यावेळी श्री नारायण मंदिर समितीचे अध्यक्ष एन. मोहनदास, राज्यपालांचे उपसचिव एस. रामामूर्ती, समितीचे उपाध्यक्ष एस. चंद्राबाबू, इतर पदाधिकारी तसेच शिक्षक व निमंत्रित उपस्थित होते.

राज्यपाल श्री. राधाकृष्णन म्हणाले की, संस्थेने नऊ हजाराहून अधिक विद्यार्थ्यांना शिक्षण देऊन त्यांच्या जीवनात आमूलाग्र परिवर्तन घडवून आणले आहे. नारायण गुरु यांनी जातीभेद व धर्मभेद विरहित समाजाची संकल्पना मांडली व समतेचा पुरस्कार केला. त्यांची शिकवण अंगीकारली तर आपण निश्चितपणे अधिक प्रगती करु.

श्री नारायण मंदिर समिती शिक्षण संस्था गेल्या सहा दशकांपासून गोरगरीब विद्यार्थ्यांसाठी आधुनिक शिक्षणाची व्यवस्था करीत आहे. वडील दीना बामा पाटील यांच्यापासून आपण संस्थेसोबत कार्य करीत आहोत. या संस्थेच्या कार्यातून इतर शैक्षणिक संस्थांनी प्रेरणा घ्यावी, असे आवाहन खासदार संजय दीना पाटील यांनी यावेळी केले.

यावेळी राज्यपालांच्या हस्ते संस्थेच्या स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले तसेच माजी पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. सुरुवातीला राज्यपालांनी संस्थेच्या आवारातील श्री नारायण गुरु मंदिरात जाऊन नारायण गुरूंची आरती पूजा केली.

संस्थेचे महासचिव ओ. के. प्रसाद यांनी प्रास्ताविक केले तर अध्यक्ष एम. आय. दामोदरन यांनी संस्थेच्या कार्याची माहिती दिली. समितीचे उपाध्यक्ष एस. चंद्राबाबू यांनी आभार मानले.

व्हर्च्युअल गॅलॅक्सी इन्फोटेक कंपनीने डिजिटल इंडिया साकारण्यात योगदान द्यावे : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुख्यमंत्र्यांच्या प्रमुख उपस्थितीत (ऑनलाईन) कंपनीची लिस्टिंग

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई : डिजिटल इंडियाचे स्वप्न साकार करण्यासाठी व्हर्च्युअल गॅलॅक्सी इन्फोटेक लिमिटेड कंपनीने योगदान द्यावे, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले.

वर्षा निवासस्थान येथून दूरदृश्य प्रणालीद्वारे मुख्यमंत्र्यांच्या प्रमुख उपस्थितीत व्हर्च्युअल गॅलक्सी इन्फोटेक लिमिटेडच्या नॅशनल स्टॉक एक्सचेंजमधील लिस्टिंग झाली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी कंपनीचे उपाध्यक्ष आशुतोष घोलप उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, सन १९९७ मध्ये व्हर्च्युअल गॅलक्सी इन्फोटेक कंपनीची सुरुवात नागपूरमध्ये अविनाश शेंडे आणि सचिन पांडे यांनी केली. छोट्या स्वरूपात सुरू झालेली ही कंपनी भारताच्या आयटी क्षेत्रात एक मोठी शक्ति बनली आहे, याचा अवघ्या महाराष्ट्राला अभिमान आहे.

कंपनीची देशात १६ ठिकाणी व विदेशात तीन ठिकाणी कार्यालये आहेत. या कंपनीला मिहान (नागपूर) येथील येथे १० एकर जागा मिळाली असून येथील मोठ्या प्रमाणात उद्योग विकास होऊन मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण होतील, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

अविनाश आणि सचिनसारख्या तज्ज्ञ व्यक्तींनी त्यांची स्वप्ने साकार करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांचा प्रवास राज्यातील हजारो उद्योजकांना मोठी स्वप्ने पाहण्याची, धाडसीपणे काम करण्याची करण्याची प्रेरणा देईल, असे मुख्यमंत्री म्हणाले. यावेळी कंपनीच्या माहिती पुस्तिकेचे अनावरण मुख्यमंत्र्यांच्या हस्ते पार पडले.

'रेरा' कायद्यामुळे महाराष्ट्रातील रियल ईस्टेट क्षेत्राला विश्वासार्हता : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

नागपूर ■ दिलीप येवले

विकास प्रक्रियेत रियल ईस्टेट क्षेत्राचा सहभाग महत्वाचा



नागपूर : सर्वसामान्यांच्या मनात एखादी प्रॉपर्टी, घर, फ्लॅट घेतांना अनेक प्रकाराच्या शंका असतात. या शंकांचे तेवढ्याच पारदर्शिपणे समाधान होणे आवश्यक असते. रियल ईस्टेट क्षेत्राला शासन पातळीवर पारदर्शिपणे सहकार्य व्हावे यादृष्टीने आपण अनेक बदल केले. 'रेरा' सारखा कायदा देशात आपण सर्वात अगोदर सुरू केला. सुमारे ५० हजार प्रकल्प रेरा अंतर्गत नोंदणी झाले हे आपल्या राज्याचे सर्वात मोठ यश आहे. संपूर्ण देशात नोंदणी झालेल्या प्रकल्पाएवढी ही संख्या आहे. यातून निर्माण झालेली विश्वासार्हता रियलईस्टेट क्षेत्राला अत्यंत सहायभूत ठरली असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

हॉटेल सेंटर पॉइंट येथे नरडेकोच्या नूतन कार्यकारणीच्या पदग्रहण समारंभात ते बोलत होते. यावेळी अर्थ राज्यमंत्री ॲड आशिष जयस्वाल, विधानपरिषद सदस्य संदिप जोशी, ॲड अभिजित वंजारी, आमदार कृष्णा खोपडे, आमदार प्रविण दटके, माजी खासदार कृपाल तुमाणे, नरडेको विदर्भचे नुतन अध्यक्ष डॉ. कुणाल पटोले, चेयरमन घनश्याम ढोमणे व इतर मान्यवर उपस्थित होते.

नरडेको विदर्भ ही संस्था विकासकांच्या हितासमवेत ग्राहकांच्या हिताला अधिक जपणारी आहे. यात सर्वसामान्यांचे हित अधिक जपल्या जाते. शासनाच्या विविध धोरणांची नरडेको प्रामाणिकपणे अंमलबजावणी करते ही समाधानाची बाब असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. देशाच्या विकासाला रियल ईस्टेटने लावलेला हातभार अधिक महत्वाचा आहे. ६५ टक्के जीडीपी शहरातून आहे हे लक्षात घेवून आम्हीही या क्षेत्रात अधिक पारदर्शकता यावी यादृष्टीने उपाययोजना केल्या आहेत. आता कोणत्याही रियल ईस्टेट उद्योजकाने आपले प्रपोजल एखाद्या कार्यालयात दाखल केले तर त्याला मंजूरीच्या प्रक्रियेत कोणत्या टेबलवर किती वेळ लागतो याची माहिती ऑनलाईन उपलब्ध होईल असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले.

राज्याच्या आरोग्य धोरणाबाबतचा प्रस्ताव तातडीने सादर करा : मंत्री प्रकाश आबिटकर

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई : सार्वजनिक आरोग्य विभाग अधिक गतिमान, लोकाभिमुख व पारदर्शी करण्याच्या दृष्टीने राज्याच्या आरोग्य धोरणाबाबतचा प्रस्ताव तातडीने सादर करण्याचे निर्देश आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी आरोग्य भवन येथे झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत दिले.

आरोग्य मंत्री आबिटकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीस आरोग्य सचिव डॉ. निपुण विनायक, सचिव वीरेंद्र सिंह, आयुक्त अमगोथू श्रीरंगा नायक, संचालक डॉ. नितीन अंबाडेकर, संचालक विजय कंदेवाड, संचालक डॉ. स्वप्नील लाळे यांचेसह अवर सचिव व सहसंचालकस्तरीय वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत राज्याची आरोग्य सेवा अधिक बळकट होण्यासाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले.

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांचा शासन सेवेत समावेश करणे तसेच त्यांचे मानधन वाढीचा प्रस्ताव लवकर सादर करण्याबाबत निर्देश आरोग्य मंत्री आबिटकर यांनी यावेळी दिले असून, प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेतील कर्मचाऱ्यांच्या समावेशनाबाबत महिला व बालकल्याण विभागाच्या शासन निर्णयाचा पाठपुरावा करण्याच्या सूचनाही दिल्या.

वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या बदली प्रक्रियेमध्ये पारदर्शीपणा असावा. आठ वर्षापेक्षा जास्त सेवा झालेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या प्रशासकीय बदल्या समुपदेशाने करण्यात याव्यात. त्यानंतर विनंती बदल्या करण्यात याव्यात. तसेच एस-२३ या वेतनश्रेणीतील अधिकाऱ्यांच्या बदल्या त्यांचे रिपोर्ट कार्ड पाहून करण्यात याव्यात, समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांच्या ३१ मे पुर्वी प्रथमतः आंतरजिल्हा बदल्या करण्यात याव्यात, त्यांना सोयीचा जिल्हा देण्यात यावा, त्यानंतर जिल्हा अंतर्गत बदल्या करण्यात याव्यात. तसेच पाठ्य निदेशिका यांचे नर्सिंग ट्विटर पदोन्नतीसाठीचे सेवा प्रवेश नियम दीडशे दिवसाच्या कार्यक्रमाचे अजेंड्यावर घेऊन बदलण्यात यावेत, अशा सूचनाही आरोग्य मंत्री आबिटकर यांनी दिल्या.

शासनाला जास्तीत जास्त वर्ग - १ चे वैद्यकीय अधिकारी उपलब्ध होतील यासाठी एमपीएससीकडे पाठपुरावा करून ही पदे तातडीने भरावीत. बॉम्बे नर्सिंग होम ॲक्ट व इतर कायद्यामध्ये सुधारणा करण्यासाठी लीगल फर्मची नियुक्ती करण्यात यावी. कोणत्याही परिस्थितीत पावसाळी अधिवेशनामध्ये या कायद्यामधील सुधारणा विधेयक सादर करण्याचे निर्देश मंत्री आबिटकर यांनी या बैठकीत दिले.

वैद्यकीय सहाय्यता कक्ष कर्मचाऱ्यांना प्रोत्साहनपर भत्ता देण्याचा तसेच आशा वर्कर यांना आयुष्मान भारत कार्ड काढण्यासाठी पाच ऐवजी वीस रुपये मोबदला देण्याबाबतचा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सादर करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. कोल्हापूर छत्रपती संभाजीनगर व मुंबई येथे वैद्यकीय सहायता कक्ष स्थापन करण्याचे सूचनाही आरोग्यमंत्र्यांनी यावेळी दिल्या.

दीडशे दिवसाचा कृती आराखडा सार्वजनिक आरोग्य विभागाने तयार करून २० मे, २०२५ पर्यंत सादर करावा. ग्रामीण स्वच्छता व आरोग्यदायी अभियान ही योजना राज्यात सुरू करण्याबाबतचा सविस्तर प्रस्ताव सादर करणे तसेच केंद्र सरकारने त्यांच्या अर्थसंकल्पात घोषणा केल्याप्रमाणे १७ ठिकाणी कॅन्सर डे केअर सेंटर सुरू करणे, तसेच टीबी मुक्त पंचायत व तंबाखू मुक्त शाळा हे अभियान सुरू करण्याबाबत त्यांनी सूचनाही आरोग्य मंत्री आबिटकर यांनी दिल्या.

आदिवासी व दुर्गम भागामध्ये काम करणाऱ्या डॉक्टरांना विशेष सुविधा देण्याबाबतचा प्रस्ताव सादर करावा. केंद्र सरकारच्या च्च च्या धर्तीवर नवीन प्रयोगशाळा स्थापन करण्यासबंधी ४४ कोटी रुपयांची पुरवणी मागणी ३१ मे पर्यंत वित्त विभागास सादर करावा. पीएम मेडिसिटी प्रोग्रामसाठी ५० एकर जागेची व विमानळाची उपलब्धता विचारात घेऊन कोल्हापूर किंवा पुणे येथे जागा उपलब्धता पाहण्याच्या सूचना दिल्या. या बैठकीत प्राप्त बजेट पुरवणी मागण्यातसेच २०२५ च्या अर्थसंकल्पामध्ये मंजूर असलेल्या तरतूदी विचारात घेऊन तात्काळ प्रस्ताव सादर करून वित्त विभागाकडे ३१ मे पूर्वी पाठवण्याचे निर्देश, आरोग्य मंत्री आबिटकर यांनी दिले.


संपादकीय...

पर्यावरणद्वेषी पळवाटा...

'पर्यावरणीय मंजुरी'ची वाट न बघता थेट प्रकल्प उभारू लागायचे, मग सरकारने ही मंजुरी 'पूर्वलक्ष्यी प्रभावाने द्यायची; याला न्यायालयाने चाप लावला. पर्यावरण रक्षणाच्या मुद्द्यावर उक्ती आणि कृतीत प्रचंड विरोधाभास हा भारतातल्या कोणत्याही सरकारचा स्थायिभाव राहिला आहे. मग ते सरकार कोणत्याही पक्षाचे वा आघाडीचे असो. जे बोलायचे त्याच्या अगदी विरुद्ध करायचे, नंतर त्याचे समर्थन करताना देशाच्या प्रगतीसाठी उद्योग वा मोठे प्रकल्प कसे आवश्यक अशी भलामण करायची. ती करताना पर्यावरणाच्या रक्षणासाठी आम्ही कसे कटिबद्ध, असेही सांगत प्रतिमा जपण्याचा प्रयत्न करायचा, हेच आजवर दिसले. २०१४ नंतर विकासाची प्रचंड मोठी भूक असलेले सरकार सत्तेत आल्यावर या धोरणाला काही धरबंधच उरला नाही व पर्यावरणविषयक सर्व कायद्यांना मुरड घालून प्रकल्पांना मान्यता देण्याचा सपाटा सुरू झाला. त्याला पायबंद घालणारा निकाल सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी दिला. त्यासाठी न्यायमूर्तीद्वय अभय ओक व उज्ज्वल भुयान यांचे अभिनंदन! मुंबईतील वनशक्ती या पर्यावरण रक्षणासाठी काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थेने दाखल केलेल्या याचिकेवर निकाल देताना न्यायालयाने पूर्वलक्ष्यी प्रभावाने पर्यावरणीय मंजुरी देण्याची सरकारची पळवाटच बंद करून टाकली. ही वाट तयार करण्यासाठी सरकारने २०१७ साली काढलेली अधिसूचना व २०२१ मध्ये प्रसृत केलेली मानक कार्यपद्धती रद्द केली. त्यामुळे हा निर्णय दूरगामी परिणाम करणारा ठरतो. पर्यावरण रक्षण करायचे असेल तर आहे ते जंगल राखले जावे यासाठी सत्तर व ऐंशीच्या दशकात अनेक कायदे करण्यात आले. १९८६ चा पर्यावरण रक्षण कायदा हा त्यातलाच एक. हेतू हाच की कुठल्याही कारणासाठी जंगल नष्ट करायचे असेल तर त्याची वेगवेगळ्या स्तरावर छाननी होऊन मगच निर्णय झाला पाहिजे. त्याला अनुसरून मग 'पर्यावरण प्रभाव मूल्यांकन' ही प्रक्रिया सक्तीची झाली. या सक्तीसाठी केंद्राने २००६ला अधिसूचनाही काढली. याच अधिसूचनेला विद्यमान मोदी सरकारने धाब्यावर बसवले व नवे नियम अमलात आणण्याचा प्रयत्न केला. तो या निकालातून न्यायालयाने हाणून पाडला आहे. जंगलक्षेत्रातील कोणत्याही प्रकल्पाला पर्यावरणीय मंजुरी मिळाल्यानंतरच सुरुवात करता येते हा आजवर करण्यात आलेल्या कायद्याचा मथितार्थ. 'हे सरकार तोच बदलायला निघाले होते. त्यामुळे सरकारकडून तत्त्वतः मान्यता मिळाल्यावर अशी मंजुरी घेण्याची वाट न बघता थेट प्रकल्प उभारणीलाच सुरुवात करायची हा प्रकार विविध उद्योग तसेच सरकारी आस्थापनांकडून रूढ होत गेला. सरकारच्या मूकसंमतीशिवाय हे शक्यच नव्हते. नंतर याच उद्योगांना पर्यावरणीय मान्यता देण्यासाठी सरकारने एक खिडकी योजना सुरू केली. त्यात पर्यावरणाचा ऱ्हास करणाऱ्या २५५ प्रकल्पांना मान्यता देण्याचा प्रस्ताव ठेवण्यात आला. हे सरळसरळ कायद्याचे उल्लंघन होते. अशी प्रकल्पोत्तर मान्यता देणे योग्य नाही असे म्हणत स्वयंसेवी संस्था न्यायालयात गेल्यावर २०२१ मध्ये या योजनेवर स्थगिती आली. तोवर सरकारने ५५ प्रकल्पांना मान्यता देऊन टाकली होती. यात अनेक खाणप्रकल्प, स्टीलउद्योग, विमानतळ, मद्यानिर्मितीचे कारखाने व काही सरकारी प्रकल्पांचा समावेश आहे. आता न्यायालयाने ही योजना अमलात आणण्यासाठी सरकारने काढलेल्या सर्व अधिसूचना बाद ठरवल्याने सरकार तोंडघशी पडले असले तरी पर्यावरण रक्षणाचे काय हा प्रश्न उरतोच. जगातील तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था होण्याकडे झेप घेणारा देश या मुद्द्यावर किती बेफिकिरीने वागतो हे या निकालातून दिसले आहे. देशाचा औद्योगिक विकास व्हायला हवा, त्याच्या आड कुणी येऊ नये हे मान्यच, पण तो साधताना प्रदूषण वाढणार नाही, वातावरणीय बदलाला कारणीभूत ठरणार नाही हाही दृष्टिकोन अंगी बाळगणे गरजेचे. नेमकी त्याचीच वानवा या सरकारमध्ये दिसते. या मुद्द्यावरून कुणीही एखाद्या प्रकल्पाला विरोध केला की त्याला थेट अर्बन नक्षल ठरवणे, तुरुंगात टाकणे, परदेशी हस्तक म्हणणे असे अश्लाघ्य प्रकार सत्ताधाऱ्यांच्या पातळीवर अलीकडे सुरू झाले. पर्यावरणाच्या क्षेत्रात काम करणाऱ्या अनेक संस्थांची सरकारने मुस्कटदाबी केली ती याच काळात. त्यांना मिळणाऱ्या परदेशी निधीवर बंधने आणली. यामुळे अनेक संस्थांना गाशा गुंडाळावा लागला. पण याने वास्तव कसे बदलणार? नेमक्या त्याच वास्तवाचे भान हा निकाल देतो. देशात सध्या आठ लाख २७ हजार चौरस किलोमीटरचे क्षेत्र जंगलाने व्यापले आहे. म्हणजे एकूण भौगोलिक रचनेच्या २५ टक्के. हे क्षेत्र ३३ टक्क्यांपर्यंत नेण्याचे सरकारचेच उद्दिष्ट आहे. त्यासाठी २०५० पर्यंतची कालमर्यादा निश्चित करण्यात आली आहे. गेल्या २५ वर्षांत केवळ सहा टक्के जंगल वाढले. त्यामुळे येत्या २५ वर्षांत हे उद्दिष्ट गाठणे कठीण. अशा स्थितीत आहे ते जंगल राखणे हेच सरकारचे कर्तव्य असायला हवे. प्रत्यक्षात गेल्या २५ वर्षांत ११ हजार ४३७ हेक्टर जंगल विविध प्रकल्पांच्या नावावर नष्ट करण्यात आले. सरकारच्या या धोरणामुळे हे नष्ट होण्याचे प्रमाण बेसुमार वाढले असते. या निकालाने नेमका त्यालाच चाप लावला आहे. पर्यावरणाचे रक्षण करणे हे सरकारचे सांविधानिक कर्तव्य आहे असे हा निकाल सांगतो. प्रत्येक नागरिकाला शुद्ध हवा, पाणी मिळते की नाही ते बघण्याचे काम सरकारचे. ते करायचे सोडून विकासाच्या नावावर निसर्गाची लूट करण्याचा अधिकार सरकारला नाही. पर्यावरणविषयक जागतिक परिषदेत (कॉप) कार्बन उत्सर्जन कमी करू अशी आश्वासने द्यायची. त्यासाठीची कालमर्यादा जाहीर करायची. पण प्रत्यक्षात दरवर्षी जागतिक पातळीवर जाहीर होणाऱ्या पर्यावरणीय मूल्यांकन निर्देशांकात भारत कायम तळाशी असतो. अलीकडची यादी तपासली तर भारत १८० देशांच्या यादीत १७६व्या क्रमांकावर आहे. जंगल नष्ट झाले की जैवविविधता संपुष्टात येते. यातही भारताचा क्रमांक १७० आहे. यावरून या क्षेत्रातील भारताची अधोगती तेवढी दिसते. कोणत्याही सरकारसाठी ही भूषणावह बाब कशी ठरू शकते? पर्यावरणाचा -हास करत उद्यघोग विस्तार हे विकसित राष्ट्रांनी केव्हाच अमान्य केलेले तत्त्व. त्यामुळे जागतिक पातळीवर अनेक देशांत योग्य ते संतुलन राखत असे प्रकल्प मार्गी लावले जातात. भारताला हे संतुलन कधीच साधता आले नाही. सामान्यांच्या नजरेत भरेल असाच विकास विद्यमान सरकारला हवा असतो. त्यासाठी वाटेल तशी कायदेमोड करण्यासाठी तत्पर असलेले सत्ताधारी भविष्यात भेडसावणाऱ्या या संकटाचा विचार करणार तरी कधी? पर्यावरणाच्या हासाचा थेट परिणाम वातावरण बदलावर होतो. त्याचे परिणाम आताच देशाला सहन करावे लागत आहेत. यामुळे निसर्गाचे चक्रच बदलून गेले आहे. उष्णता व अवेळी येणाऱ्या पावसाचा फटका सर्वच प्रांतांना बसू लागला आहे. हे वास्तवदेखील उद्यघोगप्रेमी आणि उद्योजकप्रेमी सरकार लक्षात घ्यायला तयार नाही. सरकारच्या विरोधात जाणारा निकाल आला की त्याचे पालन करण्याऐवजी पुन्हा नवनवे कायदे करून न्याययंत्रणेला धुडकावून लावण्याचा प्रकार सरकारकडून केला जातो. किमान या प्रकरणात तरी सरकारने असे वागू नये ही अपेक्षा. कारण हा मुद्दा कोट्यवधी नागरिकांच्या जीवनमरणाशी संबंधित आहे. न्यायालयाने हा निकाल देताना आडवाटेने मंजुरी मिळवलेल्या ५५ प्रकल्पांविरुद्ध कोणतीही कारवाई प्रस्तावित केलेली नाही. हा एक प्रकारे अभय देण्याचाच प्रकार. आता हे प्रकल्प बंद केले तर मोठे नुकसान होईल हे सरकारचे मत न्यायालयाने ग्राह्य मानले. यावरच सत्ताधाऱ्यांनी समाधान मानणे इष्ट. सरकारने पुन्हा नव्या प्रर्यावरणद्वेषी पळवाटा शोधण्याचा प्रयत्न करू नये. तेच देशवासीयांच्या हिताचे आहे.

बाजारमूल्य वाढविणारे भक्तिस्पर्धक आणि निरंकारी बाबा!

(पू.निरंकारी बाबा हरदेवसिंहजी महाराज पुण्यस्मरण व निरंकारी समर्पण दिन)



'जीवन के हैं दो किनारे एक जन्म हैं एक मरण।
जो जन्मा हैं वो मरता हैं धनवंता हैं या निर्धन।
जन्म मरण के बीच का जीवन श्रेष्ठ हैं अनमोल हैं।
कहें 'हरदेव' कि गुरु ज्ञान से पड़ता इसका मोल हैं।'
ड पवित्र सम्पूर्ण हरदेव बाणीः पद क्र. १६०.

आजच्या बहुढंगी, बहुरंगी दुनियेत स्वतःला ईश्वरी अवतार मानून आपले बाजारमूल्य वाढविण्याची स्पर्धा भक्तीपंथात जोमाने फोफावलेली दिसून येत आहे. या स्पर्धेतूनच अनेक पाखंडी कलंकित होत आहेत, शांती, संयम आणि औदार्य अशा त्रिगुणांच्या अनोख्या संगमामुळे संतशिरोमणी हृदयसम्राट सत्यसम्राट बाबा हरदेवसिंहजी महाराज यांनी लाखो अनुयायी जोडले आणि मानवतेची पूजा करणारा निरंकारी पंथ जगभर पसरविला. संत निरंकारी मिशनमध्ये जगातील सर्व जाती-धर्माचे लोक गुण्यागोविंदाने नांदू लागले, कारण कोणाच्याही व्यक्तिगत जीवनशैली किंवा श्रद्धा भावनांना धक्का न लावता केवळ मानवतेच्या आधारावर आपुलकी, प्रेम, सद्भावना, सामंजस्याने व एकोप्याने आनंदाने जीवन जगायला शिकवणारी विचारधारा युगद्रष्टा बाबा हरदेवसिंहजींनी जोपासली व वृद्धिंगत केली. बाबाजी यथार्थ व यशस्वी मानवी जीवन जगण्याची कला शिकवत असत. त्यांनी आध्यात्मिक व भौतिक जीवनाशी अशी सुंदर सांगड घातली, त्यामुळेच जगभर ही विचारधारा लोकप्रिय बनली व हवी हवीसी वाटू लागली. कारण संतोक्तीची प्रचिती त्यांच्या पावन सान्निध्याने आली. जगतगुरू जगतवंद्य संतश्रेष्ठ तुकारामजी महाराजांनी समजाविले होते-



संकलन व सुलेखन -
श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.एक प्राणीप्रेमी.
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त व्हॉट्सॲप- ९४२३७१४८८३.

'मागे पुढे ब्रह्म दाटे! म्हणती देव आहे कोठे!!
मृगा नाभिचा परिमळ! व्यर्थ फिरे रानोमाळ!!'
गुरुकृपा झाल्यावरी! ब्रह्म सृष्टी दिसे सारी!!
तुका म्हणे ऐसी भ्रांती! देव असता नाही म्हणती!!

संयुक्त राष्ट्रसंघाने आपल्या सामाजिक व आर्थिक परिषदेवर संत निरंकारी मंडळाला सल्लागाराचा दर्जा दिला. सन २०१३मध्ये बाबाजींना गांधी ग्लोबल फॅमिलीच्या वतीने प्रतिष्ठित महात्मा गांधी सेवा मेडलने सन्मानित करण्यात आले, तर सन २०१४मध्ये गांधी शांती पुरस्कार प्रदान करण्यात आला. दि.५ ऑगस्ट २०१५ रोजी इंग्लंडमध्ये स्वेच्छा सामाजिक सेवेसाठी देण्यात येणाऱ्या सर्वोच्च क्वीन्स गोल्डन ज्युबिली अॅवॉर्डने बाबाजींना सन्मानित करण्यात आले. कारण माणसाशी माणसे जोडून मानवता धर्म स्थापित केला. संतश्रेष्ठ गोस्वामी तुलसिदासजींच्या वाणीतून प्रत्यय आला-

'सुनहु देव सचराचर स्वामी।
प्रनतपाल उर अन्तरजामी।।
उर कुछ प्रथम वासना रही।
प्रभु पद प्रीति सरित सो बही।।'
(पवित्र रामचरित मानसः ५-४९-३)

(अर्थः बिभिषणजीने कहा, हे देव, हे चराचर जगत के स्वामी! हे शरणागत के रक्षक! हे सबके हृदय के भीतर के जानने वाले! सुनिए, मेरे हृदय में पहले कुछ वासनाएँ थी। वह प्रभु के चरणों की प्रीतिरूप नदी में बह गईं।)

सत्यसम्राट हृदयसम्राट बाबा हरदेवसिंहजी महाराज यांचा जन्म दि. २३ फेब्रुवारी १९५४ रोजी दिल्ली येथे झाला. सन १९७१मध्ये त्यांनी निरंकारी सेवादलामध्ये प्राथमिक सदस्य म्हणून प्रवेश केला आणि सेवादलाची सुती खाकी वर्दी घालून सेवेचा आनंद लुटला. सन १९७५ मध्ये त्यांनी निरंकारी युथ फोरमची स्थापना केली. या फोरमचे लक्ष्य होते- साधे व सदाचारी जीवन जगणे, प्रेम व भक्तिपूर्ण सेवा, अनावश्यक उधळपट्टीला आळा आणि नशाबंदी साधणे. दि. २४ एप्रिल १९८० रोजी कट्टरपंथी धर्माधांनी मिशनचे तत्कालीन प्रमुख, सद्गुरू बाबा गुरुबचन सिंहजी यांच्यावर निशाना साधून शहीद केले. तरुण बाबा हरदेवांनी शरीररुपातील सद्गुरु व पिताही गमावला होता. निरंकारी मिशनच्या प्रत्येक अनुयायाचे धैर्य, संयम आणि सहनशीलता पणाला लागावी असा तो क्षण होता. दि. २७ एप्रिल १९८० रोजी बाबा हरदेवसिंहजींना मिशनचे सांप्रत सद्गुरू व प्रमुख म्हणून घोषित करण्यात आले. शांती, प्रेम आणि विश्वबंधुत्व स्थापन करण्याचे आश्वासन कृतीत उतरविण्यासाठी बाबा हरदेवसिंहजी महाराज यांनी देश-विदेशांमध्ये विस्तृत प्रचार यात्रा आयोजित केल्या. त्यांच्या मार्गदर्शनाखाली संत निरंकारी मिशन मानवता, विश्वबंधुत्व, प्रेम, शांती, समता, अहिंसा अशी महान ध्येये गाठणारी आध्यात्मिक चळवळ बनून नावारुपाला आली आहे. सर्व धर्मग्रंथांचे अमूल्य सारामृत त्यातून प्रवाहित केले. गुरु नानकदेवजींचे अनमोल वचन सार्थक वाटतात-

'गुरु किरपा जेहि नर पैं कीन्ही तिन यह जुगति पिछानी!
नानक लीन भयो गोबिंद सों ज्यो पानी संग पानी!!'
डपवित्र भजन संग्रह- गीता प्रेसः पृ.सं. १८०.

सन २०१६ मधील जून महिन्याच्या शेवटी होऊ घातलेल्या द्वितीय निरंकारी आंतरराष्ट्रीय संत समागमाच्या पूर्वतयारीची पाहणी करण्याच्या उद्देशाने ते कॅनडाच्या कल्याण यात्रेवर असतानाच दि. १३ मे २०१६ रोजी त्यांची गाडी अपघातग्रस्त झाली आणि त्यातच मानवतेचे कार्य करत असतानाच त्यांनी आपल्या नश्वर देहाचा त्याग केला. धन्य धन्य ते हृदयसम्राट बाबा हरदेवसिंहजी महाराज आणि त्यांचे अहर्निश मानवोत्कर्षाचे आध्यात्मिक कार्ये! मिशनमधील त्यांच्या भरीव कार्याची आठवण म्हणून त्यांचा स्मृतिदिन हा मिशनतर्फे 'निरंकारी समर्पण दिवस' म्हणून पाळला जात आहे.

'मैं नही तो कुछ न होगा सोचना नादानी हैं।
सारे सिलसिले हैं मुझसे ये कहना बेमानी हैं।
ऐ मिट्टी के पुतले इतना क्यों करता अभिमान तू।

कहे 'हरदेव' इस दुनिया में दो दिन का मेहमान तू।'
पवित्र सम्पूर्ण हरदेव बाणीः पद क्र.२८४.

राजकारणी...

नवीन पिढी आता
यावी राज कारणी
सुवर्ण संधी वेगळी
आयुष्य सत्कारणी

जोडले जाती सार्थ
ही सेना अक्षौहिणी
खजिन्यातआणावी
रत्ने ती बापन्नखणी

नव्यायुगाचीइमारत
करावी पाया भरणी
पीक बदल करताचं
संपन्न होणार धरणी

हरित क्रांती घडवा
नवीन विचार पेरणी
सोडवी क्लिष्ट प्रश्नां
सक्षम आचारसरणी

शुध्दकरे दुषीतपाणी
उपटूनकाढ घटपर्णी
उर्जा उमेदी तारुण्या
तंत्रज्ञान युक्त धोरणी

सचल्याजागी किडे
आवश्यक फवारणी
उर्जा चैतन्य निर्मीती
सक्षम राष्ट्र उभारणी

- हेमंत मुसरीफ पुणे.
९७३०३०६९९६.

क्लोजर रिपोर्ट...

तपासयंत्रणा
तत्परते
विश्वासठेवतात
खुळे
पेटी बंद रहस्ये सारी
मारून टाकले खिळे

कुजलेले व्यवस्थापन
ती दुर्गंधीसर्वत्र दर्वळे
आश्वासने तूडुंब मिळे
आशा दाखवी दरवेळे

थातूरमातूर अटक ती
चोरपुलिस खेळ खेळे
आधीचं जामीन घेता
रे मारून न्यायचे वेळे

जेरबंद चारपाच जण
आरोप दाखल दुर्बळे
शृंखलाबध्द करुनिया
खात्यास बनवी दुबळे

नोंदी करी अधिकारी
केले काम हातावेगळे
बंदकरून केसेस सर्व
मोकळे झाले रे सगळे

क्लोजर रिपोर्ट सादर
झाले ते नामा निराळे
चोळून हळू हळू डोळे
रे शांत होतील धुराळे

- हेमंत मुसरीफ पुणे
९७३०३०६९९६..

जगद्गुरू संत तुकारामांचे गुरुवर्य!:२० मेः संत बाबा चैतन्य समाधी दिन

केशव चैतन्याने अनेक अद्भुत चमत्कार केल्याच्या आख्यायिका आहेत. तुकाराम महाराजांचे गुरू बाबाजी चैतन्य आणि केशव चैतन्य हे एकच होत, असे काही विद्वान मानतात तथापि बाबाजी चैतन्य हा त्याचा शिष्य होता, असे काही विद्वानांनी निदर्शनास आणून दिले आहे. त्यांची समाधी ओतूर येथे असून त्यांचा समाधिकाल सन १५७१ साली २० मे असावा, असे संशोधकाचे मत आहे.

गुरुपरंपरा- वेदव्यास, राघवचैतन्य, केशवचैतन्य अशी होती, असे कळते. तुकारामांना केशवचैतन्यांचे प्रत्यक्ष दर्शन घडले नाही, तर स्वप्नात त्यांना दृष्टांत झाला. याला प्रमाण म्हणून तुकारामांचा पुढील अभंग सांगितला जातो-

सदगुरूराये कृपा केली मज।
परी नाही घडली सेवा काही ?धृ?
सापडविले वाटे जाता गंगास्नाना।
मस्तकी तो जाणा ठेविला कर?१?
भोजना मागती तूप पावशेर।
पडला विसर स्वप्नामाजी?२?
राघवचैतन्य केशवचैतन्य।
सांगितली खूण मालिकेची?३?
बाबाजी आपुले सांगितले नाम।
मंत्र दिला रामकृष्णहरी ?४?
माघ शुद्ध दशमी पाहुनी गुरुवार।
केला अंगीकार तुका म्हणे?५?'

केशव चैतन्य- बाबाजी चैतन्य हे संत तुकारामांचे गुरू मानले जातात. त्याचे मूळ नाव विश्वनाथ. जन्म पुनवाडी किंवा पुणेवाडी- पुणे येथील आहे. पित्याचे नाव नृसिंह आईचे नाव आनंदी होते. उपनाम राजर्षी किंवा राजऋषी होते. गिरिजा नामक स्त्रीशी त्यांचा विवाह झाला होता. त्याशिवाय त्यांच्यावर मोहित झालेल्या झबुन्नीसा आणि रोशन या यवन स्त्रियांचाही त्यांनी भार्या म्हणून स्वीकार केला होता. पुढे आलेल्या एका आपत्तीत झबुन्निसा आणि रोशन यांना मरण आले व गिरिजेसह ते ओतुर जि. पुणे येथे आले. तेथे राघव चैतन्य या सत्पुरुषाची गाठ पडून विश्वानाथांनी त्यांचे शिष्यत्व पतकरले आणि संन्यास घेतला. केशव चैतन्य हे त्यांचे संन्यास धर्मातील नाव होय. त्यांची समाधी ओतूर येथेच आहे. कृष्णदास बैरागीकृत चैतन्यलीला या अप्रकाशित ग्रंथात केशव चैतन्याने पुढील पाच ग्रंथ लिहिल्याचे म्हटले आहे- भक्तिप्रकाश, वैकुंठपद, वासनामय देह, गीताभागवतसार आणि परमार्थविचार तथापि ते सर्व अनुपलब्ध आहेत. त्यांच्या नावावर असलेले एक पद आढळते. त्यात-

'नवविधा भक्ति निरंतर करवावी।
केशव चैतन्य शरण तुला रे।।' अशी ओळ आहे. तथापि तीत उल्लेखिलेला केशव चैतन्य हाच होय, असे मानण्यास पुरावा नाही. केशव चैतन्याने अनेक अद्?भुत चमत्कार केल्याच्या आख्यायिका आहेत. तुकाराम महाराजांचे गुरू बाबाजी चैतन्य आणि केशव चैतन्य हे एकच होत, असे काही विद्वान मानतात. तथापि बाबाजी चैतन्य हा त्यांचा शिष्य होता, असे काही विद्वानांनी निदर्शनास आणून दिले आहे. त्यांची समाधी ओतूर येथे असून त्यांचा समाधिकाल सन १५७१ साली २० मे असावा, असेही सांगितले जाते. समाधी स्थानाच्या शेजारी मांडवी नदीचा प्रवाह वाहतो.





संकलन व सुलेखन -
श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.एक प्राणीप्रेमी.
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त व्हॉट्सॲप- ९४२३७१४८८३.

!! बाबा चैतन्य महाराजांना त्यांच्या समाधी दिनी कोटी कोटी विनम्र अभिवादन !!

सिकलसेल व थॅलेसेमिया रुग्णांसाठी अत्याधुनिक उपचार सुविधांची निर्मिती : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

शासकीय वैद्यकीय रुग्णालयात विविध प्रकल्पांचे लोकार्पण

नागपूर ■ दिलीप येवले



नागपूर : प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशाला सिकलसेल व थॅलेसेमिया मुक्त करण्यासाठी पावले उचलली आहेत. या दुर्धर आजाराच्या विळख्यातून रुग्णांना मुक्त करण्यासाठी येथील शासकीय महाविद्यालयात दर्जेदार उपचार सुविधांच्या निर्मितीसाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येतील, अशी हमी देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे दिली.

शासकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे आज जवळपास ७० कोटी खर्चून निर्माण करण्यात आलेल्या विविध सुविधा व विकास कामांचे लोकार्पण मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले त्यावेळी ते बोलत होते. या प्रसंगी राज्यमंत्री ?ड. आशिष जयस्वाल, खासदार शामकुमार बर्वे, आमदार कृष्णा खोपडे, प्रवीण दटके, संदीप जोशी, कृपाल तुमाने, अभिजीत वंजारी, माजी खासदार डॉ. विकास महात्मे, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन विभागाचे आयुक्त राजीव निवतकर, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. राज गजभिये, संचालक डॉ.अजय चंदनवाले, सहसंचालक विवेक पाकमोडे, मुख्य अभियंता दिनेश नंदनवार आदी उपस्थित होते.

श्री फडणवीस म्हणाले, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय ह्या मध्य भारतातील मोठ्या स्वरूपाच्या वैद्यकीय संस्था आहेत. सर्व स्तरातील रुग्ण येथे उपचारासाठी येतात. मात्र आधुनिक काळाशी अनुरूप अशा अद्ययावत सुविधा उपलब्ध करण्याची गरज भासू लागल्याने येथे आधुनिक संसाधनांची उभारणी करण्यावर भर देण्यात येत आहे. विविध पायाभूत सुविधांमुळे या संस्थांच्या गुणात्मकतेत वाढ होणार आहे. या दोन्ही संस्थांमध्ये दर्जेदार सुविधांच्या निर्मितीसाठी व अद्ययावत उपचारासाठी जवळपास हजार कोटी उपलब्ध करून देण्यात आले आहेत. या प्रयत्नातून ह्या संस्था आधुनिक भारतातील 'स्टेट ऑफ आर्ट' वैद्यकीय संस्था म्हणून नावारूपाला याव्यात, अशी अपेक्षा मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केली.

रुग्णालयांना समाजातील आशेचे केंद्र म्हणून बघितल्या जाते. वैद्यकीय उपचार व शिक्षण क्षेत्रात या दोन्ही संस्था अग्रेसर राहाव्यात तसेच खाजगी संस्थांच्या तुलनेत येथील शिक्षण, सुविधा व उपचार अधिक दर्जेदार असावे असे सांगून श्री फडणवीस यांनी बाह्यरुग्ण तपासणी कक्ष, शस्त्रक्रिया विभाग, वैद्यकीय शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी सर्व सोयीसुविधांच्या निर्मितीवर प्राधान्याने भर द्यावा अशी सूचना केली. यातूनच नजीकच्या काळात शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचा कायापालट झालेला आपल्या दृष्टीस पडेल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला. रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. राज गजभिये यांनी प्रास्ताविकात महाविद्यालयात प्रारंभ होत असलेल्या विविध सुविधांची माहिती दिली.

मुख्यमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण व उद्घाटन करण्यात आलेली कामे

येथे कार्यरत २५० निवासी डॉक्टरांसाठी वसतिगृह, रुग्णांना ने-आण करण्यासाठी ट्रॉमा इमारत ते बाह्य रुग्ण विभाग यांना जोडणारा स्काय वॉक (४.९३ कोटी), ऑडिटोरियम (५.२५ कोटी), गंभीर आजारांचे निदान करणारी यंत्रणा न्यूक्लिअर स्कॅन (८. २९कोटी), हृदयविकार असलेल्या रुग्णांचे निदान करण्यासाठी कार्डियाक कॅथ लॅब (६.८७ कोटी), अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे शस्त्रक्रिया करण्यासाठी रोबोटिक सर्जरी सिस्टीम (२०.८२ कोटी), कॅन्सरसारख्या व इतर दुर्धर आजारांवर अत्याधुनिक उपचाराकरिता मध्य भारतातील शासकीय रुग्णालयातील पहिली न्यूक्लियर मेडिसिन सिस्टीम (८.२९ कोटी), स्मार्ट क्लास रूम (१.५ कोटी), रुग्णालयाशी संबंधित इतर सुविधा (११ कोटी)

'आयजीएमसी'त मुख्यमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (आयजीएमसी) येथे मेगा डायलिसिस सेंटर व रुग्णवाहिकांचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी त्यांनी रुग्णालयातील प्रलंबित कामांचा आढावा घेतला.

येथील विद्यार्थ्यांसाठी ३ व्हर्चुअल स्मार्ट वर्ग खोल्या तयार झाल्या असून उर्वरित चार वर्ग खोल्यांना मान्यता देण्याबाबत मुख्यमंत्र्यांनी सकारात्मकता दर्शविली व त्याबाबतचे प्रस्ताव शासनास तातडीने सादर करण्याचे आदेश दिले. रुग्णालय व महाविद्यालयाला आवश्यक त्या विविध यंत्रसामग्रीच्या उभारणीबाबत शासनास सादर केलेल्या प्रस्तावांचा पाठपुरावा करण्याच्या सूचना केल्या. रुग्णालयातील काही कामांना मान्यता मिळाली परंतु निधी प्राप्त करण्यासाठी आवश्यक ती प्रक्रिया तातडीने करण्याचे आदेश त्यांनी संबंधितांना दिले. अधिष्ठाता डॉ. रवी चव्हाण यांनी रुग्णालयात कार्यान्वित विविध कक्षांची माहिती देणारे सादरीकरण केले.

लोकार्पण करण्यात आलेली कामे

येथील पाचशे खाटांच्या इमारत निर्मितीची कामे तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी संबंधितांना केल्या. येथील विविध प्रकारच्या सोयी सुविधांच्या निर्मितीची कामे प्रगतीपथावर असून समन्वयाने व गतीने कामे पूर्णत्वास नेण्याच्या सूचना केल्या.

मेगा डायलिसिस सेंटरसाठी ८० लक्ष सीएसआर निधीतून १० मशीन लावण्यात आल्या. हे केंद्र औषध वैद्यक शास्त्र विभागाच्या अधिपत्याखाली येत असून डायलिसिस मशीन चालवण्यासाठी येथे तंत्रज्ञांची नियुक्ती करण्यात आली आहे.

संस्थेला रुग्णसेवेसाठी रक्तपेढी विभागासाठी रक्त संक्रमण व्हॅन तसेच र १ कोटी ७० लक्ष किमतीच्या चार ?म्बुलन्स उपलब्ध झाल्या आहेत. रुग्णांचे तात्काळ रोगनिदान करण्यासाठी नमुन्यांची तपासणी इथेच करता यावी यासाठी मॉलिक्युलर लॅब स्थापित करण्यात आली असून १३ कोटी ५० लक्ष एवढा निधी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंजूर केला असून ही लॅब कार्यान्वित झाली आहे

महाराष्ट्रात वरिष्ठ अधिकाऱ्यांनी राजशिष्टाचाराचे संकेत न पाळता फासला हरताळ : सरन्यायाधीश गवई यांची खंत

परभणी ■ दत्तात्रय कराळे

परभणी : सर्वोच्च न्यायालयाचे ५२ वे सरन्यायाधीश म्हणून भूषण गवई यांची निवड झाली, त्या निमित्ताने महाराष्ट्र आणि गोवा बार काऊन्सिलतर्फे मुंबईत त्यांचा भव्य असा सत्कार करण्यात आला होता. त्यावेळी त्यांनी आपल्या वैयक्तिक जीवन प्रणालीवर प्रकाश टाकल गत परिस्थितीचे वास्तव उपस्थितांसमोर ठेवले. तथापि देशाच्या सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश तथा राज्याचे 'भूषण' ठरलेले 'गवई' हे नियुक्तीनंतर प्रथमच महाराष्ट्रात आले, तेव्हा राज्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून त्यांच्या बाबतीत राजशिष्टाचार पाळला जाणे अपेक्षित होते. नव्हे, त्यांचे ते कर्तव्यच होते. गवई यांचे स्वागत, मान-सन्मान, सत्कार व अभिनंदन असे सर्वकाही यथोचित सोपस्कार पार पाडून संवैधानिक पदाचे आदरातिथ्य राखले जाणे आवश्यक होते. परंतु तसे काहीच घडले गेले नाही, (का ते घडूच दिले नाही, हा भाग संशोधनाचा असला तरी) संबंधित अधिकाऱ्यांकडून संवैधानिक पदाचा अवमान केला गेलाआहे. एवढेच नव्हेतर, राज्याचे प्रमुख सचिव, पोलीस महासंचालक आणि बृहन्मुंबई पोलीस आयुक्त या सर्वांनी राजशिष्टाचाराचे संकेत न पाळता त्याला पूर्णतः हरताळ फासला आहे. असं म्हटलं गेल्यास ते चुकीचं ठरणार नाही. त्यामुळेच न्यायाधीश गवई यांनी याप्रकरणी कमालीची खंत व्यक्त केली आहे.

सदर कार्यक्रमात बोलताना सरन्यायाधीश भूषण गवई पूरते भावुक झाले होते. सगळ्यांनी दिलेल्या शुभेच्छा आणि व्यक्त केलेले प्रेम पाहून त्यांचा ऊर भरून आला. सरन्यायाधीशपदाची शपथ घेताच देशातल्या कोट्यवधी जनतेने मला भरभरून प्रेम दिलं, असंही भूषण गवई यांनी यावेळी म्हटलं आहे.



नेमकं काय म्हणाले भूषण गवई

तुम्ही सगळ्यांनी दिलेल्या शुभेच्छा आणि व्यक्त केलेलं प्रेम पाहून माझा ऊर भरून आला. शपथ घेताच देशातल्या कोट्यवधी जनतेने मला भरभरून प्रेम दिलं. मोठ्या प्रमाणात लाभलेले हे प्रेम भविष्यातही कायम राहिले जाईल, आजचा कार्यक्रम जीवनाच्या अखेरपर्यंत लक्षात राहील, असे म्हणत त्यांनी गतकालीन जीवन प्रणालीवर प्रकाश टाकला. माझ्या जीवनाची खरी वाटचाल अमरावती जिल्ह्यातूनच सुरु झाली, नगरपरिषदेच्या शाळेमध्ये मी शिक्षण घेतले, येथेच वाढलो. आज मी जो काही आहे, त्यात आई-बाबा आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा फार मोठा सहभाग आहे, असंही गवई म्हणाले.

पुढे बोलताना गवई यांनी सांगितले की, माझ्या जीवनाच्या जडण-घडणीत माझ्या वडिलांचा मोठा वाटा आहे. मला आर्किटेक्ट व्हायचं होतं, पण वडिलांना वकील व्हावं, अशी इच्छा होती. पण काही कारणांमुळे त्यांना ते स्वप्न पूर्ण करता आलं नाही, मग त्यांनी ते स्वप्न माझ्यात पाहिलं. राजाभाऊ यांच्या सोबत मी वकिली शिकायला सुरवात केली आणि तेथून ख?ा जीवन प्रवास सुरु झाला. प्रथम मी मुंबईत काम केलं, नंतर नागपुरात गेलो. मी जेव्हा दहा वर्ष वकीली केली तेव्हा, विलासराव देशमुख मुख्यमंत्री झाले, त्यानंतर मला नागपूर येथे सरकारी वकील म्हणून काम करायला सांगितलं. त्यानंतर वयाच्या ४० व्या वर्षानंतर सर्वोच्च न्यायालयात गेलो. त्यानंतर मी सिनिअर ?डव्होकेट झालो. अनेक ठिकाणी अडचणी आल्या, पण त्यातूनही मार्ग निघाले. मी माझ्या वडिलांचं स्वप्न पूर्ण केलं.

२००३ आणि २०१९ चा प्रसंग या ठिकाणी सांगावा लागेल. एवढे वर्ष झाले तरी शेड्युल कास्ट आणि शेड्युल ट्राईव्हमध्ये अद्याप कोणीच न्यायमूर्ती पदावर कार्यरत नाही, त्यानंतर मला विचारलं, या काळात मला अनेक चांगले निर्णय घेता आले, नागपूरला अनेक झोपडपट्या होत्या, त्यावेळी मला खूप मोलाचा निर्णय मला देता आला. मला त्यावेळी नागपूरमधील लोकांच्या डोक्यावरील छत वाचवता आले, याचीही यावेळी गवई यांनी आठवण सांगितली.

दरम्यान महाराष्ट्रातल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या अनुपस्थितीवरून सरन्यायाधीशांनी नाराजी व्यक्त केली. सुप्रीम कोर्टाचे सरन्यायाधीश हे महाराष्ट्रातील असून ते पहिल्यांदाच महाराष्ट्रात येतायेत, ही बाब निश्चितच भूषणावह अशीच होती. परंतु राज्याचे पोलीस महासंचालक, मुख्य सचिव आणि बृहन्मुंबई पोलीस आयुक्तांना इथे यावं असं वाटल नाही, हे योग्य असेल तर त्याचा विचार त्यांनीच करावा, असंही गवई म्हणाले. एकूणच काय तर जी प्रणाली केंद्रानं महामहीम राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या बाबतीत वापरली, तीच प्रणाली येथे सुध्दा सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या बाबतीत राज्य सरकारतर्फेआता वापरल्याचे दिसून आले आहे. यातून काय बोध घ्यायचा तो घ्या पण संवैधानिक पदाचा तरी मान-सन्मान राखला जाणे आवश्यक ठरते हे नाकारून चालणारे नाही एवढे निश्चित..!

शिवनेरी नगर कोंढवा डी.पी.रोडचे काम सुरू करण्यासाठी मा.नगरसेवक ॲड हाजी गफूर पठाण यांचे साखळी उपोषण



पुणे ■ इसरार शेख

पुणे : शिवनेरी नगर डी.पी.रोडचे काम सन २००२ साली मंजुर झालले असून सुद्धा काम सुरु झाले नाही ह्या कारणामुळे मा. नगरसेवक ॲड. हाजी गफुर पठाण यांनी जो पर्यंत सदर डी.पी.रोडचे काम सुरु होत नाही, तो पर्यंत बेमुद्दत साखळी उपोषण करण्यात येणार असल्याचे सांगितले आहे.या उपोषणात मान्यवर उपस्थिती, आमदार श्री.चेतन तुपे,नगरसेविका परवीन हाजी फिरोज शेख,स्वीकृत नगरसेवक रईस सुंडके,मनसेचे नगरसेवक साईनाथ बाबर, मा.नगरसेविका नंदाताई लोणकर तसेच साईबा ग्रुपचे अध्यक्ष उबेदशाह उपस्थित असून सामाजिक कार्यकर्ते राजू शेख, हाजी जावेद भाई, समीर बागवान, लियाकत शेख, समीर पठाण, अजहर पठाण, जावेद पठाण, सलमान काजी, सलमान शेख, इब्राहिम शेख, अब्दुल बागवान, यासिन शेख,, कलीम शेख, कामिल शेख, मुनाफ शेख, अरबाज शेख, मान्यवर सर्व उपस्थित होते, एनआयबीम चौक येथे हे उपोषण करण्यात येत आहे.

सावळी सदोबा दक्षिण वनपरिक्षेत्रातील जंगलात बिबट्यांच्या संख्येत वाढ

आर्णी ■ धनराज पवार

दक्षिण आर्णी वनपरिक्षेत्रातील जंगलांमध्ये गेल्या तीन वर्षांत बिबट्यांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाल्याचे वनविभागाच्या ताज्या अहवालातून स्पष्ट झाले आहे. २०२३ साली केवळ बिबटे आढळले होते,तर २०२५ मध्ये पाळीव प्राण्यांच्या हल्ल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत त्यामुळे बिबट्याच्या संकेत वाढ झाली आहे,वन्यजीव संरक्षणाच्या दृष्टीने अत्यंत आशादायक मानली जात आहे.ही गणना विशेषतः आर्णी तालुक्यातील दक्षिण वनपरिक्षेत्रात करण्यात आली, जिथे जंगल तुलनात्मकदृष्ट्या विरळ असूनही वन्यजीवांची उपस्थिती लक्षणीयरीत्या नोंदली गेली. या गणनेसाठी वनविभागाने रात्रीच्या वेळी ट्रॅप कॅमेऱ्यांचा वापर केला.बिबट्यांची संख्या वाढल्याने जंगलातील परिसंस्थेची सशक्तता अधोरेखित होते. मात्र, इतर वन्यप्राण्यांच्या हालचाली फारशा आढळून आल्या नाहीत. काही ठिकाणी वाघ असल्याचे संकेत मिळाले असले, मात्र बुद्ध पौर्णिमेच्या दिवशी आकाशामध्ये ढग खूप दाटून आल्यामुळे संपूर्ण अंधारच होता त्यामुळे प्रत्यक्षात त्यांच्या हालचाली कॅमेऱ्यात कैद होऊ शकल्या नाहीत, यामुळे वनप्रेमींमध्ये किंचित निराशा दिसूनआली.वन्यजीवांचे संवर्धन आणि त्यांच्या निवासस्थानी सुरक्षितता वाढवण्यासाठी प्रशासन व स्थानिक नागरिकांनी अधिक सक्रिय भूमिका बजावण्याची आवश्यकता आहे. बिबट्यांची वाढ ही जशी समाधानाची बाब आहे, तशीच इतर प्रजातींची घटती संख्या ही चिंतेची गोष्ट आहे. व्याघ्रगणनेदरम्यान, दक्षिण आर्णी वनपरिक्षेत्रातील विविध वर्तुळांमध्ये चार मचान उभारण्यात आले होते. यावेळी वनपरिक्षेत्र अधिकारी चंदू गावंडे यांच्या नेतृत्वात,अंजनखेड वर्तुळातील कुऱ्हा बीटमध्ये वनपाल अनंत कोरडे,वनरक्षक श्री.मंजलवाड,श्री.गोहकार,श्री. नाटकर आणि इतर कर्मचारी बुद्ध पौर्णिमेच्या दिवशी मचानांवर उपस्थित होते.त्याचप्रमाणे,सावळी सदोबा वर्तुळात वनपाल श्री. घोडमारे,वनरक्षक श्री.भिमटे, मेटकर,ढेपले,तर बेलोरा वर्तुळात वनपाल श्री.धुर्वे व वनरक्षक श्री. शिंदे, फड, तंगडवार व इतर कर्मचारी गणनेसाठी उपस्थित होते.ही संपूर्ण प्रक्रिया वनविभागाच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांची साक्ष देणारी असून भविष्यात वन्यजीव संवर्धनासाठी अधिक व्यापक पावले उचलण्याची गरज अधोरेखित करते.



लोणी गावात सैन्य दलाच्या सन्मानार्थ तिरंगा रॅली आयोजन

लोणी (पुणे) प्रतिनिधी ■ कैलास गायकवाड

लोणी (पुणे) : लोणी ता. आंबेगाव येथे भारतीय सैन्य दलाच्या सन्मानार्थ तिरंगा रॅली काढण्यातआली. या रॅलीत माजी सैनिकांसह शेकडो तरूण, महिला,विद्यार्थी, पंचक्रोशीतील ग्रामस्थ यांनी सहभाग घेतला. भारत माता की जयच्या घोषणा देत सहभागींनी भारतीय सैन्य दलाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. येथील बाजारपेठेतून रॅली काढण्यात आली होती. रॅलीमध्ये विद्यार्थी,माजी सैनिक, महिला व ग्रामस्थ मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते. याप्रसंगी हुतात्मा बाबू गेनू सैद यांचे पुतणे बबनराव सैद, हुतात्मा सुधीर थोरात यांचे वडील पंढरीनाथ थोरात आणि हुतात्मा सुधीर थोरात यांची पत्नी अश्विनी थोरात, हुतात्मा जयदीप गाढवे यांच्या परिवाराचा सन्मान करण्यात आला. म तसेच माजी सैनिक व सेवानिवृत्त पोलीस अधिकारी यांचाही सन्मान करण्यात आला. महादेव मंदिर येथे रॅली सांगता करण्यात आली . याप्रसंगी माजी सरपंच उद्धवराव लंके, माजी सरपंच दिलीप वाळुंज, जगन लंके, सेवानिवृत्त पोलीस अधिकारी किसन गायकवाड, बाबाजी चासकर, नवनाथ डोके, यांनी मनोगत व्यक्त केले. तसेच पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्या नागरिकांना व सैनिकांना श्रद्धांजली वाहण्यात आली. भारत माता की जय जय, श्रीराम अमर वीर जवान अमर रहे,वंदे मातरम् या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता.. लोणी गावचे लोकनियुक्त सरपंच डॉ. सावळाभाऊ नाईक, संदीप भाऊ बनखेले, संतोष पडवळ, बाबाजी चासकर, खरेदी विक्री संघाचे मा. संचालक चंद्रकांत गायकवाड, शंकर वाळुंज, उपसरपंच स्वातीताई वाळुंज, ग्रामपंचायत सदस्य पुष्पाताई रोकडे, माऊली क्षीरसागर, संतोष पोखरकर, हर्षल सुतार, माजी उपसरपंच अधिकाताई खोमणे, अंजलीताई रोकडे, गीता ताई लंके, पोलीस पाटील संदीप आढाव, प्रकाश शिनलकर, गुलाब वाळुंज, इत्यादी मान्यवर मंडळी हजर होती.कार्यक्रमाचे आयोजन आंबेगाव तालुका भाजपचे मंडल अध्यक्ष किरण वाळुंज व लोणी ग्रामस्थ यांनी केले होते. धामणीचे माजी सरपंच सागर जाधव यांनी सूत्रसंचालन केले. आभार किरण वाळुंज यांनी व्यक्त केले.



कारेगाव रोडला गटाराविना विकासाची झळाळी

परभणी ■ दत्तात्रय कराळे

परभणी : मागील अनेक वर्षांपासून विकासाच्या प्रतीक्षेत असलेल्या कारेगाव रोडवर अपघाती खड्यांचं साम्राज्य निर्माण झालं होतं. परिणामी अनेकांच्या जीवावर बेतलं जात होतं. याप्रकरणी ज्येष्ठ पत्रकार दत्तात्रय कराळे यांनी विविध माध्यमांद्वारे आवाज उठवून प्रशासन व लोकप्रतिनिधींचे अनेकदा लक्ष वेधलं होतं. तथापि स्थानिक राजकारण व कायद्याच्या कचाट्यात सापडलेल्या या रस्त्याचा कोट्यवधींचा विकास निधी न्यायालयीन गर्तेत अटकला होता. कालांतराने का होईना परंतु वसमत रोड ते साई मंगल कार्यालय या दरम्यानच्या कारेगाव रस्त्याला आता मात्र विकासाची झळाळी मिळाली आहे. त्यामुळे पायी रहदारी करणाऱ्या नागरिकांसोबतच हजारो वाहन चालकांनीही सुटकेचा निःश्वास सोडला आहे. तथापि सदर सुधारीकरण, खडीकरण व डांबरीकरण करण्याअगोदर रस्त्याच्या दोन्ही बाजूने वसाहतींमधील घरांचं सांडपाणी व नैसर्गिक पाण्याचा निचरा होण्यासाठी तथा ते सर्व पाणी वाहून जाण्यासाठी मोठ्या गटारांची निर्मिती केली जाणे अपेक्षित होती. परंतु तसे न करता अर्धवट आणि गटाराविनाच रस्त्याला विकासाची झळाळी मिळाली आहे एवढे खरे. कदाचित त्यासाठी निधीची पूर्तता झाली नसावी.



वसमत रोड द्रुतगती महामार्गापासून ते कारेगाव नि अन्य वसाहतीसाठी असलेला एकमेव रस्ता परंतु तोही मागील अनेक वर्षांपासून खड्ड्यांचं साम्राज्य बनला जाऊन अनेक अपघातास कारणीभूत ठरला गेला होता. कित्येकांच्या जीवावर बेतणारे गंभीर प्रकारही या रस्त्यावर सतत घडले जात असत. तरीही अनेक बाईकस्वार सुसाट वेगाने प्रवास करतांना आढळून येत होते. परिणामी कोणाचा हात तर कोणाचा पाय फ्रॅक्चर होऊन ते गंभीर जखमी झाले आहेत. प्रसंगी कित्येकांच्या जीवावरही बेतले गेले आहे. अशा गंभीर अपघातांना आळा बसला जावा व संविधानाच्या अनुषंगाने अपेक्षित असलेली रस्त्याची सुविधा मिळावी, यासाठी माध्यमांनीच आवाज उठवून जनतेप्रतीचं दायित्व निभावलं. विकासाच्या दृष्टीने शासन, प्रशासनाची कायम उदासीनता दिसूनआली. स्थानिक राजकारणी मंडळींमधील अंतर्गत हेवेदावेही सतत चव्हाट्यावर आल्याचे जनतेने अनेकदा अनुभवले आहेत.

दरम्यान, मागील काही कालावधी पूर्वी कारेगाव ते क्रांतीनगर वसाहती दरम्यान असलेला जि.प.अंतर्गतचा एक कि.मी.रस्ता खडीकरण व डांबरीकरण करुन सुधारण्यात आला. परंतु लोकसभा व विधानसभा या दोन्ही निवडणूका होऊन गेल्या तरीही अर्धवट राहिलेला द्रुतगती महामार्गादरम्यानचा मनपा अंतर्गत येणारा हाच कारेगाव रस्ता विकासापासून वंचित ठेवला गेला. त्यामुळे नागरिक कमालीचे त्रस्त झाले होते. दरम्यानच्या कालावधीत अंतर्गत राजकीय कलहामुळे मंजूर कोट्यवधींच्या निधीवरही कायदेशीर गंडांतर आणले गेल्याने तो निधी बराच काळ न्यायालयीन गर्तेत लटकून राहिला होता.

दरम्यान, कालांतराने का होईना परंतु गटाराविना कारेगाव रस्त्याला मिळालेली विकासाची झळाळी रहदारी साठी दिलासा देणारी ठरली जाईल यात शंकाच नसावी.

गुरुकुलच्या विद्यार्थ्यांचा छ.संभाजी महाराज राष्ट्रीय पुरस्कारासाठी निवड

सातारा ■ प्रतिनिधी

सातारा : छावा शिवकालीन कला क्रीडा मंच महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने २१ मे २०२५ रोजी वाशी मुंबई येथे विविध क्षेत्रात नाव कमावलेल्या, तसेच विविध क्षेत्र काम करत असलेल्या शिक्षक, विद्यार्थी, सामाजिक, कला, क्रीडा ,क्षेत्रात काम करत असलेले विविध पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत, यामध्ये सातारा जिल्ह्यातील गुरुकुल क्रीडा प्रबोधिनीचे विद्यार्थी कुमारी वैष्णवी डेरे, कुमारी शर्वरी बोडरे,कुमारी ईशवरी ससाणे, कुमार धर्यशील देवडे यांना छत्रपती संभाजी महाराज नॅशनल स्पोर्ट्स अवॉर्ड २०२५ देवून करण्यात येत आहे हे विद्यार्थी केले सात वर्षात कराटे ,युनिफाईट, जम्प रोप, थोडा स्पोर्ट्स, कोण की डो, ?थलेटिक्स , भाषण,स्टेज डेअरिंग आशा विविध खेळांमध्ये जिल्हा, राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्पर्धा खेळून सातारा जिल्ह्याचे , पालकांचे व प्रशिक्षक यांचे नाव रोशन केले आहे हे चार ही विद्यार्थी वाई तालुक्यातील क्रांतिकारकांचे गाव म्हणून ओळखले जाणारे कवठे या गावातील आहेत निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे सातारा जिल्हा क्रीडा अधिकारी नितीन तारळकर साहेब, सातारा जिल्हा परिषद सदस्य संदीपभाऊ शिंदे , मा जी प सदस्य सौ रेशमाताई शिंदे,रेणबुकान परिवाराचे राज्याध्यक्ष अविनाश गोंधळी, राज्य सचिव अक्षय साळुंखे, जम्पर ऑफिस जिल्हाध्यक्ष अजित वाडकर, टेक्निकल प्रमुख अक्षय पवार उपाध्यक्ष सादिक शेख, राजश्री शाहू कला क्रीडा महासंघ राज्य कार्याध्यक्ष सुनील जाधव सर, शारीरिक शिक्षक संघटना महाराष्ट्र राज्य ,विभागीय अध्यक्ष आर वाय जाधव सर, ह भ प विलास पिसाळ, कवठे सरपंच व सर्व ग्रामस्थ युनिफाईट वेलफेअर असोसिएशन, जम्प रोप असोसिएशन , थोडा स्पोर्ट , कोण की डो,स्किल डो, असोसिएशन , चे सर्व सदस्य कोच, विद्यार्थी पालक वर्ग सातारा तसेच विविध क्षेत्रात काम करणाऱ्या संघटना यांनी या विद्यार्थ्यांचे कौतुक व अभिनंदन केले या विद्यार्थ्यांना प्रशिक्षक म्हणून श्री नितिन सुर्यवंशी सर, तेजस गायकवाड, यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

१५ ऑगस्ट रोजी करंजा व कोंढरी ग्रामस्थांचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषण करंजा रेवस पूल बाधित प्रकल्पग्रस्तांचे बेमुदत आमरण उपोषण

दै, जनप्रभात उरण ता.प्रतिनिधी ■ विठ्ठल ममताबादे

उरण : २९६३. ९७ करोड रुपये खर्चाच्या करंजा रेवस पुलाच्या निर्माण कामात प्रकल्प बाधित शेतकरी ग्रामस्थ आणि स्थानिक मच्छिमार आदींना मिळणारा मोबदला, भू संपादन, नुकसान भरपाई, रोजगार, देण्यात येणारे कॉन्ट्रॅक्ट, नोकरी या सर्वांमध्ये होत असलेल्या दिरंगाई बाबत व स्थानिक प्रकल्पग्रस्त, शेतकरी, ग्रामस्थ यांना विश्वासात न घेता रेवस पुलाचे काम सुरु केल्याने तसेच निष्पाप नागरिकांना, प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना धमकविण्याचा प्रकार सुरु झाल्याने या अन्यायाच्या निषेधार्थ करंजा व कोंढरी गावचे प्रकल्पग्रस्त, शेतकरी, ग्रामस्थ हे १५ ऑगस्ट २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय रायगड समोर बेमुदत उपोषण करणार आहेत.

समुद्र किनारी असलेल्या चाणजे ग्रामपंचायत हद्दीत करंजा गावातून सुरु असलेल्या करंजा रेवस पुलाच्या निर्माण कार्याला ऑक्टोबर २०२४ रोजी सुरवात झाली. सदर पुलाचे काम अफकॉन कंपनीच्या वतीने करण्यात येत आहे. हे काम शासनाच्या एम.एस.आर.डी.सी च्या माध्यमातून टेंडर प्रक्रिया पूर्ण करून सुरु करण्यात आले आहे. सदर काम सुरु करण्याअगोदर एम एस आर डी सी शासकीय यंत्रणे मार्फत या मार्गात बाधित होणाऱ्या जमीन मालकांना, मच्छिमारांना किंवा प्रकल्पग्रस्तांना नुकसान भरपाई देण्यात आलेली नाही. शेतकरी, प्रकल्पग्रस्त, ग्रामस्थ यांच्या सोबत शासनाने कोणतेही चर्चा केलेली नाही. या बाबतीत शासनाने कोणतेही ठोस भूमिका घेतलेली नाही. अफकॉन कंपनीच्या अथवा एमएसआरडीसीच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या शेतात जाऊन शेतकऱ्यांची परवानगी न घेता ड्रीलिंग, पायलिंग, जमीन सर्वेक्षण, जमीन मोजणीचे काम सुरु आहे. शेतकऱ्यांना विश्वासात न घेता सदर काम सुरु आहे. या सर्व प्रकारामुळे शेतकऱ्यांमध्ये व प्रकल्पग्रस्तांमध्ये एमएसआरडीसी आणि अफकॉन कंपनीच्या अधिकाऱ्यां विरोधात प्रचंड संताप, रोष निर्माण झाला आहे. शासकीय अधिकारी वर्गांकडून दडपशाही आणि हुकूमशाही पद्धतीचा वापर करून अफकॉन कंपनी कडुन शेतकऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याची भीती दाखविण्यात येत आहे. त्यामुळे शेतकरी, ग्रामस्थ, प्रकल्पग्रस्त वर्गात संतापाची लाट पसरली आहे. संबंधित कंपनी प्रशासन कडून सेवानिवृत्त पोलीस अधिकारी हे उरण मधील शासकीय अधिकाऱ्यांना हाताशी धरून शेतकऱ्यांना फसविण्याचा प्रयत्न करीत असल्याचा आरोप सदर ग्रामस्थ, शेतकरी, प्रकल्पग्रस्तांनी केला आहे. या सर्व पार्श्वभूमीवर करंजा व कोंढरी गावातील ग्रामस्थ, शेतकरी, प्रकल्पग्रस्तांनी १५ ऑगस्ट २०२५ रोजी म्हणजेच स्वातंत्र्य दिनी रायगड जिल्हाधिकारी कार्यालय समोर बेमुदत आमरण उपोषण करण्याचा निर्णय घेतला आहे. या संदर्भात दिनांक १७/५/२०२५ रोजी चाणजे ग्रामपंचायत कार्यालयात महत्वाची बैठक संपन्न झाली. या बैठकीला चाणजे ग्रामपंचायत सरपंच अजय म्हात्रे,उपसरपंच श्रीमती कल्पना पाटील,सागर कडू माजी सभापती,सचिन डाऊर सामाजिक कार्यकर्ता,व्यंकटेश म्हात्रे,महेश म्हात्रे सदस्य, प्रकाश पाटील,राजन घरत,प्रकाश थळी, दिनेश म्हात्रे,जगदीश ठाकूर, मेघनाथ थळी,परेश म्हात्रे, मधुकर थळी,निलेश भोईर आदी करंजा आणि कोंढरी मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.



अफकॉन कंपनी व एम एस आर डी सी हे करंजा व कोंढरी गावातील शेतकरी प्रकल्पग्रस्त, ग्रामस्थांची मोठया प्रमाणात फसवणूक करीत आहेत. शेतकऱ्यांना प्रकल्पग्रस्तांना कोणताही मोबदला अथवा नुकसान भरपाई मिळालेली नाही त्यामुळे शेतकरी संतप्त झाले आहेत. शेतकऱ्यांना धमकविण्याचे व गुन्हा दाखल करण्याचे धमक्या देण्यात येत आहेत. त्यामुळे झालेल्या अन्यायाच्या विरोधात १५ ऑगस्ट २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय अलिबाग येथे बेमुदत आमरण उपोषण करण्याचा एकमुखी निर्णय प्रकल्पग्रस्त, शेतकरी, ग्रामस्थां तर्फे घेण्यात आला आहे.

- सचिन डाऊर, सामाजिक कार्यकर्ते तथा करंजा गाव ग्रामस्थ.

आम्ही कोणावरही अन्याय करत नाही.आम्ही कोणाचेही फसवणूक करत नाही.आम्ही शासनाच्या आदेशानुसार काम करीत आहोत.

श्री. कोरे, अफकॉन कंपनीचे अधिकारी.

मातोश्री सुरताबाई चव्हाण विद्यालयाच्या उत्कृष्ट निकाल ; विद्यालयाचा निकाल ९२टक्के परिसरातून विद्यार्थ्यांचं कौतुक; कु.कांचन खोडे विद्यालयातून प्रथम

आर्णी ■ धनराज पवार

आर्णी तालुक्यातील आदिवासी बहुल ग्रामीण परिसरातील आदर्श गाव दातोडी येथील मातोश्री सुरताबाई चव्हाण माध्यमिक विद्यालय हे ग्रामीण भागात शिक्षणासाठी ओळखले जाणारे एक महत्वाचे विद्यालय आहे. या शाळेतील विद्यार्थ्यांनी मार्च २०२५ मध्ये झालेल्या दहावीच्या परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवलं आहे. शैक्षणिक क्षेत्रात उंच भरारी घेतली आहे,या परीक्षेत कु. कांचन विलासराव खोडे या विद्यार्थिनीने ८८.८०इ गुण घेऊन विद्यालयातून प्रथम क्रमांक पटकाविला आहे, तर कु.रिद्धिषा दत्ता मेसेवार ह्या विद्यार्थिनीने ८०.८०इ गुण घेत विद्यालयातून दुसरा क्रमांक पटकाविला आहे, आणि तन्मय अतुल कांबळे या विद्यार्थ्यांनी ८०.४०इ गुण मिळवले आहेत.या तिन्ही विद्यार्थ्यांचे शाळेत आणि गावात कौतुक केलं जात आहे. या वर्षी शाळेचा एकूण निकाल ९२इ लागला असून शाळेने यंदाही गुणवत्तेची परंपरा कायम ठेवली आहे. या शाळेतील अनेक माजी विद्यार्थी आज शासकीय नोकरीत कार्यरत आहेत. त्यामुळे ही शाळा गुणवत्तेच्या बाबतीत परिसरात नेहमीच आघाडीवर राहिली आहे.शासनाकडून राबविण्यात आलेल्या 'काफीमुक्त शाळा अभियान' या उपक्रमातही या विद्यालयाने चांगला सहभाग दिला. त्याचा सकारात्मक परिणाम विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर झाला आहे.या यशाबद्दल विद्यार्थी म्हणतात की, त्यांना हे यश मिळवण्यासाठी विद्यालयातील शिक्षकांनी सतत मार्गदर्शन केलं,आणि आई-वडिलांनीही मोलाची साथ त्यामुळेच यशाचे शिखर गाठता आलं.

शेती व शेतकऱ्यांच्या भाग्योदयासाठी एक राष्ट्र - एक कृषी व एक टीम : केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांची घोषणा

मुख्यमंत्री फडणवीस यांनी जलयुक्त शिवार क्षेत्रात दिलेल्या योगदानाचा कृषीमंत्र्यांनी केला गौरव

नागपूर ■ दिलीप येवले

नागपूर : आमचे शेतकरी हे मेहनती आहेत. निसर्गाच्या प्रत्येक आव्हानाला ते धैर्याने तोंड देतात. आपल्या शेतातील उत्पादनासाठी घाम गाळतात. त्यांच्या घामाला, कष्टाला न्याय देण्यासाठी भारतातील कृषी क्षेत्रासाठी काम करणारे सर्व संशोधक, केंद्र सरकार, राज्य सरकार व सर्व संस्था एकत्र येऊन मिशन मोडवर काम करण्याची गरज आहे. व्यवस्थेतील ही त्रृटी दूर करण्यासाठी एक राष्ट्र - एक कृषी व एक टीम म्हणून कृषी विभाग आता काम करेल, अशी घोषणा केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी केली.

महाराष्ट्र शासन कृषी विभाग, भारतीय कृषी अनुसंधान परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विकसित कृषी संकल्प अभियानअंतर्गत किसान संमेलनात ते बोलत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सुरेश भट सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमास कृषी मंत्री ॲड . माणिकराव कोकाटे, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, कृषी राज्यमंत्री ॲड . आशिष जयस्वाल, खासदार श्याम बर्वे, आमदार आशिष देशमुख, आमदार चरणसिंग ठाकूर, कृषी विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, कुलगुरु नितीन पाटील, कृषी आयुक्त सुरज मांडरे, भारतीय कृषी अनुसंधान परिषदेचे डॉ.एम.एल.जाट, डॉ.एस.के.सिंग, डॉ.अमरेश कुमार नायर, डॉ.डी.के. यादव, डॉ. राजवीर सिंह व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



शेती व शेतकऱ्यांसाठी भारतीय कृषी अनुसंशाधन परिषदेअंतर्गत देशात १६ हजार वैज्ञानिक आहेत. त्यांचे विविध पिकांवर सतत संशोधन सुरु असते. याचबरोबर परिषदेअंतर्गत ११३ संशोधन केंद्र आहेत. यातील ११ केंद्र महाराष्ट्रात आहेत. याचा जोडीला जिल्हा कृषी केंद्र, प्रगतशील शेतकरी, राज्य सरकारचे कृषी कार्यालये आहेत. या सर्व यंत्रणेमध्ये एकसुत्रतेचा अभाव लक्षात घेऊन एक राष्ट्र - एक कृषी व एक टीम या संकल्पनेची नितांत गरज होती असे केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी सांगितले.

कृषी हा भारतीय व्यवस्थेचा कणा आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली आपण गौरवशाली भारत, समृद्ध भारत पाठोपाठ शक्तीशाली भारत निर्माण केला आहे. भारत आता वैभवशाली राष्ट्र म्हणून पुढे आले आहे. याला अधिक भक्कम जर करायचे असेल तर विकसित शेती व विकसित शेतकरी हे तत्व आपण जपले पाहिजे. विकसित खेती व समृद्ध किसान पाठोपाठ विकसित व गरिबीमुक्त गाव हे शासनाचे लक्ष असल्याचे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी जलयुक्त शिवार क्षेत्रात दिलेल्या योगदानाचा कृषीमंत्र्यांनी केला गौरव

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कृषी क्षेत्राच्या विकासाला चालना देण्यासाठी महाराष्ट्रात जलसंधारणाची जी कामे केली त्याला तोड नाही. जलयुक्त शिवार महाराष्ट्राला वरदान ठरले. संयम, धैर्य व निश्चयी वृत्तीने त्यांची कार्यशैली कोणत्याही आवाहनात डगमगली नाही या शब्दात केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्याचा गौरव केला. या कार्यक्रमाच्या निमित्ताने येथे उपस्थित असलेले भारतीय कृषी अनुसंशाधन परिषदेचे सर्व संशोधक व वरिष्ठ अधिकारी महाराष्ट्राच्या कृषी विकासाचा रोडमॅप तयार करतील असे त्यांनी सांगितले.

देशात कृषी संशोधन करणाऱ्या लॅबची कमतरता नाही. संशोधकाची कमतरता नाही. शासकीय कृषी विभागाचीही कमतरता नाही. कमतरता आहे लॅबला अर्थात संशोधनाला शेताच्या बांधावर पोहोचविण्याची. ही कमतरता भरुन काढण्यासाठी वर्षातील एक महिना कृषी संशोधक, अधिकारी हे शेताच्या बांधावर जाऊन शेतकऱ्यांसोबत काम करतील असे केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी स्पष्ट केले. शेतीतील उत्पादन खर्च कमी करण्यासाठी नविन तंत्रज्ञानाला जवळ करण्याशिवाय पर्याय नाही. याच बरोबर विविध खतांसाठी कंपन्यांना शासन जी सबसिडी देते ती सबसिडी थेट शेतकऱ्यांच्या खात्यात देण्याचा आम्ही निर्णय घेत असल्याचे सुतोवाच त्यांनी केले.

२०२६ अखेरपर्यंत शेतकऱ्यांना दिवसाचे १२ तास मिळेल स्वच्छ वीज- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस


राज्यात शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या विजेच्या प्रश्नाला मार्गी लावण्यासाठी आम्ही धोरणात्मक निर्णय घेतल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. शेतकऱ्यांना दिवसाही विजेचा पुरवठा व्हावा यासाठी केंद्र सरकारच्या कुसुम योजनेला आम्ही मुख्यमंत्री सौर कृषी योजनेची जोड दिली आहे. यातून १६ हजार मेगावॅट वीज निर्मितीचे काम आम्ही सुरु केले असून आजच्या घडीला यातील ४ हजार मॅगावॅटची निर्मिती पूर्णत्वास आली असल्याचे ते म्हणाले. २०२६ च्या अखेरपर्यंत आम्ही दिवसाचे १२ तासही वीज देण्यासह राज्यात १२ महिने विजेची उपलब्धता करु असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

विदर्भ आणि मराठवाड्यातील पाणीप्रश्न मार्गी लागावा, दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांना सावरता यावे यादृष्टीने देशातील सर्वात मोठा नदीजोड प्रकल्प म्हणून ज्याकडे पाहिले जात आहे त्या नळगंगा-वैनगंगा या प्रकल्पाचे काम यावर्षी सुरु करत असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. याचबरोबर तापी मेगा रिचार्ज हा जगातील आश्चर्य असणाऱ्या प्रकल्पाचे काम आपण हाती घेतले आहे. समुद्राला वाहून जाणारे सुमारे ३५ टिएमसी पाणी या प्रकल्पातून आपण आणणार आहोत. बुलडाणा, अकोला, अमरावती या जिल्ह्यातील खारपान पट्टा क्षेत्राला याचा लाभ होणार आहे. येथील लाखो शेतकऱ्यांचे जिवनमान या प्रकल्पातून उंचावले जाईल असे ते म्हणाले. राज्यातील कृषी क्षेत्राला सावरण्यासाठी नानाजी देशमुख कृषी संजीवन योजना आपण जागतिक बँकेशी चर्चा करुन सुरु केली. सुरुवातीला आपण ५ हजार गावे यासाठी निवडले. या गावानी साध्य केलेला बदल पाहून जागतिक बँक पुन्हा सहकार्यासाठी तयार झाली. आता त्यांच्या सहयोगातून राज्यातील सुमारे ७ हजार ५०० गावात एकात्मिक पद्धतीने काम करुन कृषी क्षेत्रात परिवर्तन घडवू असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

शेतीसाठी शेतमजूरांचा प्रश्न सर्वत्रच भडसावत आहे. यावर मार्ग काढण्यासाठी यांत्रिकीकरणाचा पर्याय अधिक भक्कम करुन तो शेतकऱ्यांपर्यंत आपल्याला पोहोचवावा लागेल, असे प्रतिपादन महाराष्ट्राचे कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांनी केले. शेतकऱ्यांना यांत्रिकीकरण परवडण्याच्यादृष्टीने केंद्र सरकार विचार करावा, असे आवाहन त्यांनी केले. ग्राम विकास आणि कृषी विकास याचे आदर्श मॉडेल केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी मध्यप्रदेशमध्ये विकसित करुन दाखविले आहे. शेतीपुढे अनेक आव्हाने आहेत. मातीपासून प्रदूषित पाण्यापर्यंतची आव्हाने असून संशोधक यातून मार्ग देत आहेत. महाराष्ट्र शासनाचा कृषी विभाग शेतकऱ्यांना सावरण्यासाठी कटीबद्ध असल्याचे राज्यमंत्री ?ड. आशिष जयस्वाल यांनी सांगितले. या कार्यक्रमात राष्ट्रीय मृद स्पेक्ट्रल व कापसावरील गुलाबी बोंड अळीला प्राथमिक अवस्थेत नियंत्रणासाठी उपयोगी पडणाऱ्या एआय फेरोमन ट्रॅपचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

पाण्यावर चालणारी गॅस शेगडी चा प्रयोग यशस्वी; श्री श्री रविशंकर यांच्या आश्रमात प्रात्यक्षिक प्रयोग आमदार महेश शिंदे यांची संकल्पना

कराड ■ राहुल पवार



सातारा कराड : जलावरण शिलावरण वातावरण हे नैसर्गिक चक्र चालण्यासाठी अत्यंत उपयुक्त घटक आहेत. या घटकात मुळे निसर्गाची अन्नसाखळी टिकून राहते परंतु आत्ता पर्यावरणाचा घात होत आहे भौतिक सुविधा साठी निसर्गातील अनेक घटकाचा वरती घात होत आहे देशातील नद्यांची परिस्थिती अत्यंत बिकट आहे. मानवाच्या मूलभूत गरजेसाठी जंगल. इतर गोष्टींचा रास होत आहे. हायड्रोजन कार्बन याचे मिश्रण असते कधी याचा स्फोट होण्याची शक्यता असते त्यामुळे दुर्घटना होतात विशेष गॅस निर्मिती भविष्यामध्ये बाहेरून घेण्यामुळे खर्च उत्पादन प्रक्रियेमध्ये वाढत आहे याला पर्याय म्हणून पर्यावरण पूरक निसर्गच्या अन्नसाखळी वरती कुठलाही परिणाम न होण्यासाठी व कमी खर्चात ही प्रक्रिया पूर्ण करून त्यामुळे निसर्गाचा समतोल याच्यावर कोणताही घातक परिणाम न करता पाण्यावर चालणारी गॅस शेगडी ही जीवना आवश्यक वस्तू कृष्णा विकास महामंडळ यांच्या संकल्पनेतून आमदार महेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली व यांच्या कल्पक इच्छाशक्तीतून पाण्यावर चालणारी गॅस शेगडी बनवली आहे त्याचं प्रात्यक्षिक श्री श्री रविशंकर आश्रम आर्ट ऑफ लिव्हिंग प्रमुख आश्रम बेंगलोर येथे प्रात्यक्षिक व माहिती आमदार महेश शिंदे यांनी दिली श्री श्री रविशंकर यांच्या उपस्थित हजारो कार्यक्रम संपन्न झाला यावेळी श्री श्री रविशंकर यांनी या उपक्रमाचे कौतुक केले पर्यावरण निसर्ग अन्नसाखळी या घटकावर या नैसर्गिक पाण्यावर चालणाऱ्या गॅस शेगडी चा कोणताही परिणाम होणार नाही आणि कमी खर्चात हे लोकांना उपलब्ध करावे नैसर्गिक क्रांती घडवू शकेल असा विश्वास श्री श्री रविशंकर यांनी व्यक्त केला या उपक्रमाबद्दल आमदार महेश शिंदे यांचं कौतुक मतदार संघासह सातारा जिल्ह्यात होत आहे

२१ मे रोजी ऑटो रिक्षा चालकांचे राज्यव्यापी आंदोलन

लोणंद ■ पांडूरंग कुंभार

लोणंद : महाराष्ट्र मंत्रिमंडळाने नुकताच बेरोजगार युवकांना स्वयंरोजगाराची संधी देण्याच्या नावाखाली ई-बाईक टॅक्सी चालवण्याचा घेतलेला निर्णय हा रिक्षा चालकांच्या मुळावर उठला असल्याने तो निर्णय त्वरित मागे घ्यावा यासाठी कृती समिती महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष शशांक राव यांच्या नेतृत्वाखाली व सरचिटणीस विलास भालेकर यांच्या मार्गदर्शनाखाली बुधवारी २१ मे रोजी सकाळी ११ वाजल्यापासून राज्यातील सर्व प्रादेशिक परिवहन कार्यालयासमोर निदर्शने करणार असल्याचे पश्चिम महा. कृती समितीचे उपाध्यक्ष प्रशांत सातव यांनी सांगितले.

ऑटो रिक्षा चालकांवर सुरू असलेला अन्याय .त्वरित बंद करण्यात यावा यासाठी .ऑटो रिक्षा चालक-मालक संघटना कृती समिती महाराष्ट्रने बुधवारी २१ मे रोजी महाराष्ट्रभर आंदोलन करण्याचे ठरवीले आहे. या अंतर्गत बारामती उपप्रादेशिक परिवहन कार्यासमोर ऑटो रिक्षा चालकांचे आंदोलनाच्या माध्यमातून निदर्शने करण्यात येणार आहे. आपल्या हक्कासाठी आणि अन्यायाविरुद्ध आवाज उचलण्यासाठी बारामती दौंड इंदापूर येथील ऑटो रिक्षा चालक मालकांनी मोठ्या संख्येने या आंदोलनात आपल्या ऑटो रिक्षा सह सहभाग घ्यावा असे आवाहन श्री प्रशांत (नाना) सातव यांनी केले आहे. बारामती येथे होणाऱ्या या आंदोलनात दौंड ऑटो रिक्षा महासंघाचे अध्यक्ष प्रा. डॉ. भीमराव मोरे यांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

साकोली पोलीस स्टेशनची कारवाई: अवैध रेती वाहतूक करणारा ट्रॅक्टर जप्त, ७ लाख ६ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत

भंडारा ■ प्रतिनिधी

भंडारा : साकोली - साकोली पोलीस स्टेशन अंतर्गत पोलिसांनी अवैध रेती वाहतूक करणाऱ्या एका ट्रॅक्टरवर कारवाई केली आहे. या कारवाईत ७ लाख ६ हजार रुपये किमतीचा ट्रॅक्टर, ट्रॉली आणि त्यातील रेतीसह एकूण मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पोलीस स्टेशन साकोली अंतर्गत ट्रॅक्टर चालक समीर गणेश टेकाम (वय २० वर्ष, रा. बरडकिन्ही, ता. साकोली, जि. भंडारा) हा ट्रॅक्टर मालक विकास वाघाडे (वय अंदाजे २७ वर्ष, रा. बरडकिन्ही, ता. साकोली, जि. भंडारा) यांच्या सांगण्यावरून आर्थिक फायद्यासाठी अवैध रेती वाहतूक करत होता.

या माहितीच्या आधारावर पोलिसांनी घटनास्थळावर कारवाई केली. यावेळी एक हिरव्या रंगाचा जॉन डीअर कंपनीचा ट्रॅक्टर (एमएच/उ-२२३५) आणि त्यास जोडलेली लाल रंगाची विना क्रमांकाची ट्रॉली आढळून आली. या ट्रॅक्टर व ट्रॉलीची अंदाजे किंमत ७,००,००० रुपये आहे. तसेच, ट्रॉलीमध्ये अंदाजे ०१ ब्रास रेती (किंमत अंदाजे ६,००० रुपये) मिळून आली.

पोलिसांनी पंचासमक्ष हा एकूण ७,०६,००० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्ती पत्रकानुसार जप्त केला. ही अवैध रेती वाहतूक करून पर्यावरणाचे नुकसान करण्यात आले तसेच शासनाचा महसूल बुडवण्यात आला, असे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणी चालक समीर गणेश टेकाम आणि मालक विकास वाघाडे या दोघांविरुद्ध फिर्यादीच्या लेखी रिपोर्टनुसार अपक्र १७९/२०२५, कलम ३०३(२), ४९ (मा.न्या.स.), कलम ४८ (८) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम सहकलम ७, ९ पर्यावरण संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक नूरुल हसन, अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे, पोलीस निरीक्षक आग्रेकर यांच्या मार्गदर्शनाखाली साकोली पोलीस स्टेशनच्या पथकाने यशस्वीपणे पार पाडली..

रांजणगाव गणपती येथे श्री साई मंदिर भूमिपूजन सोहळा

रांजणगाव गणपती प्रतिनिधी ■ बाळासाहेब कुंभार



रांजणगाव गणपती: रांजणगाव गणपती येथे भव्य साई मंदिर उभारण्यासाठी येत्या २२ मे २०२५ रोजी सकाळी ०९:३० वाजता मंगलमूर्ती विद्याधाम शाळेजवळ भूमिपूजन समारंभ केला जाणार असून त्याची तयारी मोठ्या जोमाने करण्यात येत आहे. श्रीक्षेत्र रांजणगाव गणपती ते शिर्डी पायी पालखी सोहळा, साई मंदिर सेवा समिती व समस्त ग्रामस्थांच्या वतीने भूमिपूजन सोहळा भव्यदिव्य स्वरूपात करण्यात येणार आहे.

मंदिरासाठी रांजणगाव गणपती येथील दानशूर व देव, देश, धर्मासाठी नेहमी अग्रेसर असणाऱ्या फंड कुटुंबीयांनी २००० स्क्वेअर फूट जागा दिली असल्याची माहिती श्री दयानंद निळोबा फंड गायत्री उद्योग समूहाचे सर्वेसर्वा यांनी दिली.

भूमिपूजनाला सर्व परिसर आकर्षक फुलांनी व रांगोळीच्या पायघड्यांनी सुशोभित केला जाणार असून या धार्मिक समारंभात कोण कोण मान्यवर सामील होणार याविषयी भाविक व ग्रामस्थ यांची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

अतिथी मान्यवरांना निमंत्रित करण्यात आले असून यात ना .दिलीपराव वळसे पाटील आमदार शिरूर आंबेगाव विधानसभा, ना.अमोलजी कोल्हे खासदार शिरूर लोकसभा, ना .शिवाजीराव आढळराव पाटील म्हाडाचे अध्यक्ष व माजी खासदार शिरूर लोकसभा, ना .माऊलीआबा कटके आमदार शिरूर हवेली, ना. अशोकबापू पवार माजी आमदार शिरूर - हवेली ना .पोपटराव गावडे माजी आमदार शिरूर, ना .प्रकाश शेठ रसिकलाल धारिवाल नगराध्यक्ष शिरूर नगरपरिषद, ना .देवदत्तजी निकम माजी सभापती कृषी उत्पन्न बाजार समिती आंबेगाव , ना .सुरेश गोरक्षनाथ वाबळे माजी विश्वस्त साई संस्थान शिर्डी, ना .गोरक्ष गाडीलकर मुख्य कार्यकारी अधिकारी शिर्डी संस्थान, ना . लक्ष्मण तनपुरे राहुरी नगरपरिषद व सर्व आजी माजी सदस्य जिल्हा परिषद, पंचायत समिती, निर्मल ग्राम ग्रामपंचायत रांजणगाव गणपती व विकास सोसायटी व समस्त ग्रामस्थ रांजणगाव गणपती उपस्थित राहणार आहेत.

श्री साई मंदिर भूमिपूजन समारंभासाठी आता केवळ काही दिवस बाकी असताना रांजणगाव गणपती येथे होणाऱ्या श्री च्या मंदिर उभारणीसाठी सढळ हाताने देणग्यांसाठी आयोजकांकडून आवाहन करण्यात येत आहे. वेदमंत्राच्या जयघोषात लवकरच भव्य सोहळा संपन्न होणार आहे. यासाठी सर्वांना निमंत्रित केले आहे असे श्री साई मंदिर सेवा समिती व पायी पालखी सोहळा समिती संयोजकांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.

अश्लील व्हिडिओंचा मुलांवर दुष्परिणाम! पालकांनी आत्ताच जागे होण्याची गरज

वाघोली (पुणे) ■ स्वरुप गिरमकर

(पुणे) वाघोली : डीजिटल युगात मुलांना स्मार्टफोन आणि इंटरनेट सहजपणे उपलब्ध झाल्याने, त्यांचा ऑनलाइन अनुभव कधीच सीमारेषा ओलांडतो. अश्लील व्हिडिओ आणि पोर्नोग्राफीला मुलांचं आकर्षण वाढल्याने त्यांचे मानसिक, शारीरिक आणि भावनिक आरोग्य धोक्यात येत आहे. मुलांच्या जीवनात अशा प्रकारच्या कंटेंटचा प्रवेश त्यांची नैतिकता, मूल्यं आणि भविष्यातील नातेसंबंधांवर गंभीर परिणाम करू शकतो. त्यामुळे पालकांनी याबाबत जागरूक होणं अत्यंत महत्त्वाचं आहे.

अश्लील कंटेंट मुलांच्या भावनिक समजावर प्रभाव टाकतो. त्यांना प्रेम आणि नातेसंबंधांबद्दल चुकीच्या अपेक्षा निर्माण होतात, ज्यामुळे त्यांचे मित्र, कुटुंबीय किंवा भविष्यातील जोडीदारांशी नातं अधिक जटिल आणि तणावपूर्ण होऊ शकतं. मुलं इतरांसोबत खुला संवाद ठेवण्याऐवजी, अशा नकरात्मक विचारांमध्येच अडकतात.

शारीरिक विकासावर होणारा परिणाम

अश्लील व्हिडिओ पाहणं शरीराच्या नैसर्गिक शारीरिक आणि लैंगिक वाढीवर प्रतिकूल प्रभाव टाकतो. मुलांना शारीरिक संबंधांची चुकीची ओळख करून दिली जाते आणि त्यांच्या इच्छाशक्तीवर नियंत्रण राहणार नाही. यामुळे त्यांच्या शारीरिक आणि लैंगिक आरोग्यावर दीर्घकालीन परिणाम होऊ शकतो, जसे की असंतुष्टि, कमी आत्मविश्वास आणि वाढता अविश्वास.

पालकांनी काय करावं?

वयात आलेल्या मुलांसोबत संवाद साधा - मुलांसोबत पोर्नोग्राफीचे योग्य शिक्षण देणे अत्यंत महत्त्वाचं आहे. त्यांना हा विषय संकोच न करता आणि सहजतेने समजावून सांगावा.

समयाचा नियम ठरवा - मुलांचे स्क्रीन टाइम नियंत्रित करा. फक्त अभ्यासासाठी किंवा निर्माणशील क्रियाकलापांसाठीच इंटरनेटचा वापर होईल याची काळजी घ्या.

उत्साही आणि अनुकूल वातावरण तयार करा - घरात एक खुला आणि समंजस वातावरण तयार करा, जेणेकरून मुलं आपल्या पालकांशी कोणत्याही गोष्टीवर विश्वासाने बोलू शकतील.

मुलांमध्ये सकारात्मक विचारांची रुंजवण..

मुलं पोर्नोग्राफीपासून दूर राहण्यासाठी त्यांच्या विचार प्रक्रियेत सकारात्मक बदल घडवणं महत्त्वाचं आहे. त्यांना त्यांच्या भावनात्मक आणि शारीरिक बदलांची समज देणे, त्यांचं शारीरिक आरोग्य आणि भावनिक समतोल राखण्यास मदत करेल. हे सर्व पालकांच्या मार्गदर्शनानेच शक्य होईल.

- डॉ.ज्योती जाधव, वाघोली, पुणे.

मुलांवर अश्लील व्हिडिओंचा प्रभाव दूर करण्यासाठी, पालकांनी त्यांच्या मुलांबरोबर संवाद साधणे आणि डिजिटल कंटेंटच्या बाबतीत जागरूकता वाढवणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे ते एका शुद्ध आणि सकारात्मक मानसिकतेत वाढू शकतात.

- डॉ. पल्लवी मेहरे, वाघोली, पुणे.

सचिन बेडभर यांची साहित्यक्षेत्रात उत्तुंग भरारी

रांजणगाव गणपती प्रतिनिधी ■ बाळासाहेब कुंभार



रांजणगाव गणपती:पुणे जिल्ह्यातील युवा साहित्यिक सचिन बेंडभर यांचे मराठी साहित्यात विपूल लेखन आहे. आजपर्यंत त्यांची ५८ पुस्तके प्रकाशित आहेत. यात बालसाहित्य, कथासंग्रह, कवितासंग्रह, कादंबरी आणि अनुवाद असे त्यांचे विविधांगी लेखन आहे. या वर्षीचा राज्य शासनाचा आदर्श शिक्षक पुरस्कार त्यांना मिळाला आहे.

मुळ पिंपळे जगताप (ता. शिरूर) गावच्या शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या बेंडभर यांच्या विविध साहित्य निर्मितीची महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाने दखल घेत त्यांच्या कळो निसर्ग मानवा या कवितेची निवड सहावीच्या सुगमभारती पुस्तकात केली आहे. तसेच मामाच्या मळयात या बालकाव्यसंग्रहाचा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पदव्युत्तर पदवी (एम.ए.) द्वितीय वर्षीच्या अभ्यासक्रमात पुढील पाच वर्षांसाठी समावेश करण्यात आला आहे.

स्वतः लेखक व कवी असून वयापेक्षा विपुल साहित्य संपदा स्वतःच्या नावावर असलेल्या सचिन बेंडभर यांच्या कथा,कविता,लेख,कादंबरी विविध लोकप्रिय वृत्तपत्रातून,मासिकातून तसेच दर्जेदार दिवाळी अंकातून सातत्याने प्रकाशित होत आहेत.

'येते जगाया उभारी' हा प्रकाशित झालेला त्यांचा काव्यसंग्रह राज्यभर गाजत आहे. या काव्यसंग्रहास आजपर्यंत आठ राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

स्वतः लिहीत असताना त्यांनी विद्यार्थी व शिक्षकांना लिहिते केले. मनातल्या कविता,शिंपल्यातले मोती आणि परीसस्पर्श अशी विद्यार्थ्यांची तीन पुस्तके त्यांनी संपादित करीत त्यांनी शाळेत अनेक बालकवी घडवले आहेत. त्यांची येते जगाया उभारी ही कविता, मंथन प्रकाशनाने शिष्यवृत्ती प्रश्नपत्रिकेत ज्ञानवंतच्या आठव्या अंकात ५ वर्षासाठी घेतली आहे. अत्यंत कमी वयामध्ये सचिन यांनी बालसाहित्य, कथा, कविता, कादंबरी, अनुवाद या वेगवेगळ्या विभागात लेखन करुन अल्पावधीत साहित्यक्षेत्रात आपला वेगळा ठसा निर्माण केला आहे.

सचिन यांच्या कथांना जसा विनोदी बाज असतो, तसा कवितांना शेती-मातीचा गंध असतो. रानवारा, गाणं शिवाराचं, येते जगाया उभारी या तीन काव्यसंग्रहातून त्यांनी शेतकऱ्याचे जीवन, त्यांचे दुःख मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

कळो निसर्ग मानवा या कवितेला वढू खुर्द ग्रामस्थांनी शाळेच्या भिंतीवर झळकवले, तर येते जगाया उभारी या कवितेलाही वाबळेवाडी ग्रामस्थांनी शाळेच्या भिंतीवर साकारले आहे.

साहित्यलेखनातील या महत्वपुर्ण योगदानाबद्दल सचिन यांना आजपर्यंत विविध सामाजिक, साहित्यिक संस्थांकडून तेरा पुरस्कारांनी गौरवण्यात आले आहे. तर साहित्य अकादमीकडून राष्ट्रीय सेमिनारसाठी गुजरातमध्ये आमंत्रित करण्यात आले होते. हिमाचल प्रदेशातील डलहौजी येथे कथासत्रामध्येही त्यांनी उपस्थिती लावली आहे. शिवांजली साहित्यपीठ जुन्नर येथे होणा-या शिवांजली बालसाहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भूषविण्याचा मान त्यांना मिळाला.

मोबाईल व सोशल मिडियामुळे नव्या पिढीचे वाचन कमी झाले आहे, अशी तक्रार होत असताना सचिन बेंडभरांसारखे कसलेले लेखन करणारे साहित्यिक याच पिढीतून तयार होत आहेत आणि वाचकांचाही त्यांना चांगला प्रतिसाद मिळतो आहे, हे मराठी भाषा संवर्धनासाठी आशादायी आहे हे निश्चित!

धोम हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी व्यक्त केली शाळेप्रती कृतज्ञता ;वरखडवाडी येथील देशमुख फार्म मध्ये माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात संपन्न



वाई ■ प्रशांत थोरवे

वाई :वाई. वाई तालुक्यातील धोम येथील उपक्रमशील शाळा नरसिंह हायस्कुल, धोम या विद्यालयाचे माजी विद्यार्थी स्नेह मेळाव्याच्या निमित्ताने तब्बल ३१ वर्षानंतर एकत्र आले. जुन्या आठवणींना उजाळा देत मित्र-मैत्रिणींची भेट होतच त्यांना शाळेचे सारे जुने दिवस आठवले. आपणही आपल्या शाळेप्रती देणे लागतो या भावनेने या विद्यार्थ्याने शाळेची भेट घेतली.

१९९४-९५ मध्ये दहावीत असलेल्या माजी विद्यार्थ्यांचा मेळावा नुकताच रविवार दिनांक १८ मे रोजी वरखडवाडी येथील देशमुख फार्मवर संपन्न झाला. सुरुवातीस काही विद्यार्थी-विद्यार्थिनी एकत्र आले. एकमेकांचे मोबाईल नंबर घेत व्हाट्सअप ग्रुप तयार करण्यात आला. ग्रुप वर एकत्र येण्याच्या तसेच स्नेहसंमेलन घेण्याच्या चर्चा सुरू झाल्या.

अखेर विद्यार्थी व विद्यार्थिनी तब्बल ३१ वर्षानंतर वरखडवाडी येथील देशमुख फार्मवर एकत्र आले. सविस्तर चर्चा केली. तदनंतर सर्वांनी शाळेला भेट दिली. बोरीव येथील बोटिंग क्लब मध्ये जाऊन मन मुराद नौका विहाराचा आनंद घेतला.

शाळेत असताना केलेल्या गमती जमती, शिक्षकांनी केलेल्या शिक्षा अशा अनेक आठवणींना उजाळा दिला. विद्यालय परिसरात विद्यार्थी पुन्हा एकत्र आल्याने अनेक जुन्या आठवणींना नव्याने उजाळा मिळाला. अनेकाना आपले शाळेचे जुने मित्र मैत्रिणी भेटल्यामुळे त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद ओसांडून वाहत होता. यापुढेही असेच एकत्र येऊन स्नेहमेळावा घ्यायचे तसेच विद्यालयात विद्यालयास सहकार्य करायचे असेही सर्वानुमते ठरवण्यात आले.

विविध योजना व उपक्रमांसाठी महाराष्ट्राला केंद्राचे संपूर्ण सहकार्य : केंद्रीय कृषि मंत्री शिवराज सिंह चौहान

नागपूर ■ दिलीप येवले

हवामानास अनुकूल पीक वाण विकसित करा; कृषी योजनांच्या लाभासाठी फार्मर आयडी मोहीमेला गती देण्याचे निर्देश



नागपूर : प्रगत बियाणे, सेंद्रिय खत, हवामान अनुकूल पद्धती, आधुनिक तंत्रज्ञान, स्मार्ट सिंचन आणि बाजारपेठेतील दुवे यांचा योग्य समन्वय शेतक-यांनी राखण्याची गरज आहे. कृषी विभागानेही देशातील अनेक भागात त्या त्या हवामानास अनुकूल पीक वाण विकसित करण्याचे निर्देश केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी कृषी विभागाला दिले. तसेच प्रत्येक शेतक-यांना फार्मर आयडी उपलब्ध करून देण्यासाठी विशेष उपाययोजना करण्याचे व आयडीशिवाय कृषी योजनाचा लाभ न देण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले. येत्या काळात विविध योजना व उपक्रमांसाठी महाराष्ट्राला केंद्राचे संपूर्ण सहकार्य असेल, असेही केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यावेळी म्हणाले.

अमरावती रोडवरील केंद्रीय कृषी संशोधन परिषदेच्या सभागृहात आज केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बैठकीदरम्यान केंद्रीय मंत्री श्री. चौहान बोलत होते. यावेळी कृषि मंत्री माणिकराव कोकाटे, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, वित्त राज्यमंत्री ॲड.आशिष जयस्वाल, कृषी विभागाचे प्रधान विकास रस्तोगी, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले यांच्यासह संबंधित विभागाचे केंद्र व राज्य शासनाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

महाराष्ट्रातील हवामान, पर्जन्यमान, कृषी क्षेत्रातील आव्हाने, खरीप हंगाम २०२५, खते आणि बि बियाण्यांची उपलब्धता, विकसित कृषी संकल्प अभियान, ॲग्रीस्टॅक अभियान, पुढील वर्षाचे नियोजन याविषयीची माहिती सादरीकरणाद्वारे कृषी विभागाचे प्रधान सचिव विकास रस्तोगी यांनी दिली. यावेळी बोलताना केंद्रीय मंत्री श्री. चौहान म्हणाले की, हवामान बदलानुसार तसेच पर्जन्यमानुसार पिकांचे विशेषतः राज्यातील कापसाचे वाण अधिकाधिक विकसित करण्याची गरज आहे. कमी पर्जन्याच्या प्रदेशातही अधिकाधिक पीक देणारे वाण विकसित होण्याची गरज आहे. राज्याचे 'बेस्ट क्रॉपिंग मॉडेल' विकसित करण्याचे निर्देशही यावेळी मंत्री श्री. चौहान यांनी दिले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कौतुक

राज्यातील कृषी तसेच ग्राम विकास विभागात सुरू असलेल्या विविध नावीन्यपूर्ण उपक्रमांबद्दल केंद्रीय मंत्री श्री. चौहान यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे बैठकीदरम्यान कौतुक केले. प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण, सँड बँक या उपक्रमांसाठी त्यांनी मुख्यमंत्र्यांचे कौतुक केले.

महाराष्ट्रातील 'सक्सेस स्टोरीज' देशभर पोहोचवा

सादरीकरणादरम्यान राज्यातील विविध भागातील शेतक-यांनी राबविलेल्या नावीन्यपूर्ण उपक्रमांची माहिती देण्यात आली. यावेळी संभाजीनगर जिल्ह्यातील टापरगाव येथील शेतकरी रावसाहेब मोहिते, बीड जिल्ह्यातील रूई (धानोरा) येथील रेशमाची शेती करणारे शेतकरी एकनाथ टाळेकर, यवतमाळ जिल्ह्यातील जवळा येथील आर्चिडची शेती करणा-या शेतकरी वंदना राठोड यांच्या यशकथा देशभरात विविध माध्यमातून पोहोचविण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

केंद्र पुरस्कृत योजनाचा घेतला आढावा

केंद्रपुरस्कृत ग्रामविकास विभागाच्या विविध योजनांचा आढावा केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला. यात प्रधानमंत्री आवास योजना, पीएम जनमन योजना, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, सेल्फ हेल्प ग्रूपअंतर्गत सुरू असलेल्या उपक्रमांची माहिती यावेळी ग्रामविकास व पंचायतराज विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले यांनी दिली. मनरेगाचा आढावाही यावेळी घेण्यात आला. यात मनरेगाच्या उद्दिष्टपूर्तीचे केंद्रीय मंत्री श्री. चौहान यांनी कौतुक केले.

एक कोटी लखपती दीदींचे उद्दिष्ट- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून मिळणाऱ्या १५०० रुपयांचा महिलांना आधार मिळाला आहे. महिलांनी या रकमेतून विविध व्यवसाय सुरु केले आहेत. महिलांना आवश्यक खर्च भागवण्यास देखील या पैशांची मदत होत आहे. यासोबतच महिलांना आर्थिक स्वावलंबी करण्यासाठी लखपती दीदी ही योजना राबविण्यात येते. येत्या काळात एक कोटी लखपती दिदी बनविण्याचे राज्याचे उद्दिष्ट असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी बैठकीदरम्यान दिली.

भंडारा-गोंदिया आणि बालाघाट परिसरातील चिन्नौर धान उत्पादक शेतकऱ्यांसाठी खासदार पडोलेंची केंद्रीय कृषिमंत्र्यांकडे राइस मिलची मागणी

भंडारा ■ प्रतिनिधी



भंडारा / गोंदिया, दि १९ मे. : भंडारा-गोंदिया लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. प्रशांत यादवराव पडोले यांनी केंद्रीय कृषी मंत्री श्री. शिवराज सिंह चौहान यांना पत्र लिहून भंडारा, गोंदिया आणि मध्यप्रदेशच्या बालाघाट परिसरात मोठ्या प्रमाणावर पिकवल्या जाणाऱ्या सुगंधी चिन्नौर धानाच्या प्रक्रिया उद्योगासाठी केंद्र सरकारच्या मदतीने आधुनिक राइस मिल सुरू करण्याची मागणी केली आहे. यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास आणि स्थानिक पातळीवर रोजगार निर्मितीस मदत होईल, असे खासदार पडोले यांनी आपल्या पत्रात नमूद केले आहे.

खासदार पडोले यांनी पत्रात म्हटले आहे की, हा चिन्नौर धान आपल्या सुवासासाठी आणि चवीसाठी प्रसिद्ध असून त्याला देश-विदेशात मोठी मागणी आहे. परंतु, दुर्दैवाने या संपूर्ण परिसरात चिन्नौर धानाच्या प्रक्रिया (पिसाई) साठी कोणतीही आधुनिक राइस मिल उपलब्ध नाही. यामुळे येथील शेतकऱ्यांना आपला पिकवलेला चिन्नौर धान कमी दरात व्यापाऱ्यांना विकावा लागतो. हे व्यापारी बाहेरच्या राज्यात धान पाठवून प्रक्रिया करतात आणि मोठा नफा कमावतात. परिणामी, शेतकऱ्यांना त्यांच्या घामाचे योग्य मोल मिळत नाही आणि त्यांच्या हक्काचा फायदा दुसरेच घेतात. स्थानिक बाजारातही हा चिन्नौर तांदूळ सहज उपलब्ध होत नाही, कारण तो बाहेर प्रक्रिया होऊन तिकडेच विकला जातो.

खासदार पडोले यांनी केंद्रीय कृषीमंत्र्यांना विनंती केली आहे की, भंडारा-गोंदिया परिसरात प्रधानमंत्री किसान संपदा योजना किंवा प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना यांसारख्या केंद्र सरकारच्या योजनेतून एक आधुनिक राइस मिल सुरू करण्यास मंजुरी देण्यात यावी. ते म्हणाले की, या राइस मिलसाठी आवश्यक असलेली जमीन, शेतकरी गट (समूह) आणि स्थानिक सहकार्य उपलब्ध आहे.

या राइस मिलमुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढेल, स्थानिक पातळीवर रोजगार निर्मिती होईल आणि चिन्नौर तांदूळ आंतरराष्ट्रीय बाजारात पोहोचण्यास मदत होईल, ज्यामुळे देशाचे नाव उंचावेल. खासदार पडोले यांनी केंद्रीय कृषीमंत्र्यांना या महत्त्वपूर्ण विषयावर त्वरित निर्णय घेऊन परिसरातील शेतकऱ्यांना याचा लाभ मिळवून देण्याचे आवाहन केले आहे.

भंडारा येथे 'ऑपरेशन सिंदूर'च्या यशानंतर भारतीय सशस्त्र दलांच्या सन्मानार्थ भव्य 'तिरंगा यात्रा

भंडारा ■ प्रतिनिधी



भंडारा : १९ मे - पहलगाम येथील भ्याड दहशतवादी हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून, आपल्या भारतीय सशस्त्र दलांनी ऑपरेशन सिंदूर सुरू केले, ज्यामध्ये पाकिस्तानच्या पंजाब प्रांतातील ९ दहशतवादी प्रशिक्षण शिबिरे उद्ध्वस्त करण्यात आली. भारतात बॉम्बस्फोटात सहभागी असलेले दहशतवादी मसूद अझहरच्या कुटुंबातील १४ सदस्य मारले गेले. भारतीय सशस्त्र दलांनी गुन्हेगारांनाही यशस्वीरित्या ठार मारले.

'ड्रोन आणि विमानांचा वापर करून पाकिस्तानने केलेल्या हल्ल्यांना भारताने प्रभावी प्रत्युत्तर दिले. भारतीय सशस्त्र दलांनी प्रत्येक हल्ला अपयशी ठरवून पाकिस्तानी लष्करी तळ उद्ध्वस्त केले. 'ब्रह्मोस' क्षेपणास्त्राच्या निशाण्यावर पाकिस्तानचे हवाई तळ उद्ध्वस्त झाल्यानंतर, पाकिस्तानला भारताशी युद्ध करणे अशक्य असल्याचे जाणवले. अखेर, पाकिस्तानने शरणागती पत्करून युद्धबंदीची विनंती केली.'

भारताने पाकिस्तानला कडक इशारा दिला आहे की, जर भविष्यात कोणत्याही दहशतवादी संघटनेने भारतावर हल्ला केला तर तो पाकिस्तानने केलेला हल्ला मानला जाईल आणि भारत त्यांच्या हद्दीतही प्रत्युत्तर देईल.

आपल्या शूर भारतीय सशस्त्र दलांना सन्मानित करण्यासाठी, आपल्या देशभरात 'तिरंगा यात्रा' आयोजित करण्यात आली आहे.

या कारवाईदरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'आत्मनिर्भर भारत'च्या दृष्टिकोनाची झलक पाहायला मिळाली, अशा मजबूत संरक्षण प्रणाली आणि तंत्रज्ञानासह.

आम्ही शूर सैनिकांना त्यांच्या धाडस आणि समर्पणाबद्दल आदर आणि सलाम करतो आणि देशासाठी आपले प्राण अर्पण करणाऱ्या शहीदांना श्रद्धांजली अर्पण करतो. ह्या प्रसंगी मोठ्या संख्येने संपूर्ण जिल्हा तील नागरिकांनी तसेच अनेक संघटनांनी सहभाग घेतला.

नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प मशाल रॅली संपन्न



काटोल ■ प्रशांत पवार

काटोल : नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा दोन अंतर्गत मौजा सावडी बुद्रुक येथे गाव स्तरावरील हवामान अनुकूल आराखडा तयार करण्याच्या शून्य दिवस मध्ये सावळी बुद्रुक येथे मशाल फेरीचे आयोजन करण्यात आले होते सदर मशाल फेरीला गावाचे सरपंच सो कांताबाई घोरमाडे तसेच माजी सरपंच विनायक रावजी पोहकर इंदिराबाई राऊत तसेच गावातील शेतकरी व महिला शेतकरी उपस्थित होते. सदर सभेला कृषी विभागातील कर्मचारी मंडळ कृषी अधिकारी श्री बोंद्रे साहेब तसेच कृषी सहाय्यक रोशन चौधरी यांनी सभेला मार्गदर्शन केले. सदर सभेमध्ये कृषी पर्यवेक्षक श्री महेंद्र सोमकुवर व कृषी विभागातील इतर कर्मचारी उपस्थित होते.

ऑपरेशन सिंदूरच्या यशानंतर खापरखेडा येथे तिरंगा सन्मान यात्रा : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रमुख उपस्थिती

खापरखेडा ■ दिलीप येवले





'भारत माता की जय' च्या जयघोषाने दुमदुमले खापरखेडा

खापरखेडा : पहलगाम येथे झालेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्याच्या प्रत्युत्तरार्थ भारतीय सेनादलांनी ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून केलेल्या महापराक्रमाच्या सन्मानार्थ नागपूर जिल्ह्यातील खापरखेडा-चिचोली ग्रामपंचायत क्षेत्रात आज सिंदूर सन्मान तिरंगा यात्रा काढण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. राज्याचे महसूल मंत्री आणि नागपूर-अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे आणि सावनेर विधानसभा क्षेत्राचे आमदार डॉ. आशिष देशमुख यांच्या नेतृत्वात ही रॅली काढण्यात आली होती.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करून यात्रेची सुरुवात झाली.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस म्हणाले की, 'ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून आपल्या भारतीय सैन्याने दहशतवाद्यांना कडक उत्तर दिले आहे, ज्याचा अभिमान प्रत्येक भारतीयाला आहे. आपल्या सैनिकांचे बलिदान आणि त्यांचा पराक्रम देशाच्या बळकटीसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. आज आपण सर्वजण त्यांच्या शौर्याचा सन्मान करण्यासाठी एकत्र आलो आहोत.'

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, आपल्या सैनिकांनी दहशतवादी आणि त्याला पोसणाऱ्या पाकिस्तानला 'ऑपरेशन सिंदूर' च्या माध्यमातून चांगलाच धडा शिकवला. आपल्या सैनिकांच्या दणक्यामुळे पाकिस्तानला सळो की पळो करून सोडले. शेवटी त्यांनी इतर देशांपुढे हात पसरवून हे युद्ध थांबविण्यासाठी गयावया केली.

अतिशय उत्साहवर्धक व देशभक्तीने प्रेरित अशा वातावरणात ही यात्रा संपन्न झाली.

यावेळी आ. डॉ. आशिष देशमुख, आ. चरणसिंग ठाकुर, माजी आमदार अशोक मानकर, माजी आमदार राजू पारवे, माजी आमदार मल्लिकार्जुन रेड्डी, माजी आमदार सुधीर पारवे, माजी आमदार टेकचंद सावरकर, भाजप प्रदेश कार्यकारणी सदस्य डॉ. राजीव पोतदार, भाजप नागपूर जिल्हाध्यक्ष मनोहरराव कुंभारे, जिल्हाध्यक्ष आनंदराव राऊत, अशोकराव धोटे, किशोर चौधरी, अरविंद्र गजभिये, प्रफुल मोहटे, नितीन गोस्वामी, विपीन नाईक, आशिष फुटाणे, माजी सैनिक आणि असंख्य नागरिक उपस्थित होते.

लोकनेत्या यशोमती ठाकूर यांच्या वाढदिवसाला सेवा, स्वाभीमानाचा संकल्प; कार्यकर्त्यांमध्ये उत्साह, अमरावतीसह जिल्ह्यात शुभेच्छांचा वर्षाव

अमरावती ■ प्रतिनिधी



अमरावती : लोकनेत्या तसेच माजी मंत्री ॲड. यशोमतीताई ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून विविध सामाजिक घटकांनी, कार्यकर्त्यांनी सेवा व स्वाभिमानाचा संकल्प करत आपल्या लाडक्या नेत्यावर शुभेच्छा तसेच सद्भावनेचा वर्षाव केला. अमरावती शहरातच नव्हेतर संपूर्ण विदर्भात सुपरिचित गौरक्षण संस्थेमध्ये यशोमतीताईंवर प्रेम करणाऱ्या त्यांच्या चाहत्यांकडून गुळतुला करण्यात आली. तर अमरावती शहरासह तिवसा मतदारसंघात ठिकठिकाणी त्यांना शुभेच्छा देणारे पोस्टर्स व बॅनर्स झळकले. विशेष म्हणजे केवळ राजकीय कार्यकर्तेच नव्हे तर मतदारसंघातील सर्वसामान्य जनता, महिला, युवक तसेच शेतकरी सुद्धा आपल्या कार्यसम्राट नेत्याला शुभेच्छा देण्यासाठी एकत्रित आले होते.

माजी मंत्री, कॉंग्रेसच्या नेत्या यशोमतीताई ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त सकाळपासूनच त्यांच्या निवासस्थानी त्यांचे कार्यकर्ते व चाहत्यांनी एकच गर्दी केली होती. कर्नाटकचे कॉंग्रेसचे आमदार प्रदीप ईश्वर यांनी त्यांच्या वाढदिवसाला हजेरी लावून कार्यकर्त्यांचा उत्साह द्विगुणित केला. कर्नाटकचे आमदार प्रदिप ईश्वर यांच्यासह बालाजी, प्रविण मनोहर, जयंतराव देशमुख उपस्थित होते. विशेष म्हणजे केवळ कॉंग्रेसचेच नव्हे तर सर्वपक्षीय चाहत्यांचा गोतावळा असल्याने त्यांनीसुद्धा ताईंना शुभेच्छा देण्यासाठी एकच गर्दी केली होती. शनिवारी सकाळी अंबादेवीच्या परिसरातील गौरक्षण संस्थेत यशोमतीताईंची गुळतुला करण्यात आली, यावेळी खासदार बळवंतराव वानखडे, माजी महापौर विलासभाऊ इंगोले, कॉंग्रेसचे शहराध्यक्ष बबलूजी शेखावत यांच्यासह कॉंग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. त्यांच्या निवासस्थानी ताईंना शुभेच्छा देण्यासाठी एकच गर्दी झाली होती. ताईंना शुभेच्छा देणाऱ्यांमध्ये प्रामुख्याने खासदार बळवंतराव वानखडे, श्री. शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धनजी देशमुख, कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष तथा जिपचे माजी अध्यक्ष बबलूभाऊ देशमुख, माजी आमदार प्रा. वीरेंद्रदादा जगताप, दिलीपबाबू इंगोले, यांच्यासह अनेक मान्यवरांचा समावेश होता.

एकच कार्यसम्राट

आपल्या नेत्याच्या वाढदिवसाला कार्यकर्त्यांचा आनंद द्विगुणित होत असतो. त्यानुसार यशोमतीताईंना शुभेच्छा देण्यासाठी अमरावती शहर तसेच मतदारसंघातील गावागावात कार्यकर्त्यांकडून पोस्टर्स व बॅनर्स लावण्यात आले होते. यशोमतीताईंच्या आमदारकीच्या कार्यकालात मतदारसंघात झालेली विकासात्मक कामांची माहिती अनेक पोस्टर्सच्या माध्यमातून देण्यात आली तर अनेक ठिकाणी कार्यसम्राट अशी पदवी यशोमतीताईंना कार्यकर्ते तसेच जनतेकडून देण्यात आली.

भंडारा पोलिसांची अवैध रेती वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरवर कारवाई; ६ लाखांचा मुद्देमाल जप्त

भंडारा ■ प्रतिनिधी



भंडारा, - भंडारा पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध रेती वाहतूक करणाऱ्या एका ट्रॅक्टर आणि ट्रॉलीवर पोलिसांनी कारवाई करून सुमारे ६ लाख ६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईदरम्यान आरोपी ट्रॅक्टर चालक घटनास्थळावरून फरार झाला असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, पोलीस स्टेशन भंडारा येथील पथक पेट्रोलिंग करत असताना, घटना स्थळी नाकाबंदी केली असता अवैध रेती वाहतूक करणारा एक विना नंबर ट्रॅक्टर आढळून आला. पोलिसांना पाहताच ट्रॅक्टर चालक घटनास्थळावरून पळून गेला.

पोलिसांनी सदर ट्रॅक्टरची तपासणी केली असता, ड्रायव्हर सीटजवळील बॉडी प्लेटवर असलेल्या इंजिन नंबर व चेसिस नंबरवरून ऑनलाईन ॲपद्वारे तपासणी केली. या तपासणीत ट्रॅक्टर मालकाचे नाव मोहसीन रिजवी मसुद रिजवी शेख, रा. तकीया वार्ड, अशरफी नगर, भंडारा असे निष्पन्न झाले. हा निळ्या रंगाचा स्वराज कंपनीचा ट्रॅक्टर असून, त्यासोबत लाल रंगाची विना नंबर ट्रॉली होती.

सदर ट्रॅक्टर (किंमत अंदाजे ६,००,००० रु.) आणि ट्रॉलीमध्ये अंदाजे १ ब्रास रेती (किंमत ६,००० रु.) आढळून आली. पोलिसांनी पंचांसमक्ष एकूण ६,०६,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

अवैधरीत्या रेती वाहतूक केल्याप्रकरणी फिर्यादीच्या लेखी रिपोर्टवरून पोलीस स्टेशन भंडारा येथे अप.क्र. ५५५/२०२५ अन्वये कलम ३०३(२)ए, ४९ सह कलम ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम आणि कलम ७, ९ पर्यावरण संरक्षण अधिनियम नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक नूरुल हसन व अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन भंडारा येथील पथकाने ही यशस्वी कारवाई केली. फरार आरोपी चालकाचा शोध पोलीस घेत आहेत. पुढील तपास सुरू आहे.

जीव धोक्यात घालून प्रवास! पलाडीसाठी सहा पदरी महामार्गावर प्रवेशासाठी झेब्रा क्रॉसिंगची मागणी

भंडारा ■ प्रतिनिधी



भंडारा : येथून जवळच असलेल्या पलाडी गावासाठी राष्ट्रीय महामार्ग क्रमांक (कोलकता-रायपूर-नागपूर-धुळे) हा आता गैरसोयीचा आणि जीवघेणा ठरत आहे. पूर्वी दोन पदरी असलेला हा महामार्ग आता सहा पदरी झाल्याने आणि दोन्ही बाजूंना सर्व्हिस रोडचे बांधकाम झाल्याने, पलाडी गावात प्रवेश करणे ग्रामस्थांसाठी तसेच इतर वाहनचालकांसाठी एक गंभीर आव्हान बनले आहे. यावर शासन, प्रशासन आणि स्थानिक लोकप्रतिनिधींचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून केला जात आहे.

महामार्गाचे बांधकाम करताना पलाडी येथे गावकऱ्यांच्या सोयीसाठी उड्डाण पूल, बोगदा किंवा झेब्रा क्रॉसिंगसारखी कोणतीही पर्यायी व्यवस्था करण्यात आलेली नाही. यामुळे अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. भंडारा शहराकडून येणाऱ्या वाहनांना पलाडीत प्रवेश करणे तुलनेने सोपे आहे, कारण गाव डाव्या बाजूला असल्याने थेट प्रवेश मिळतो.

मात्र, खरी आणि मुख्य अडचण लाखनी बाजूकडून येणाऱ्या वाहनांच्या बाबतीत आहे. लाखनीहून येणाऱ्या वाहनांना पलाडी गावात प्रवेश करण्यासाठी महामार्गावर कोणतीही सोयीची व्यवस्था नाही. त्यामुळे, त्यांना तीन किलोमीटर दूर सिंगोरी येथून किंवा दोन किलोमीटर दूर भिलेवाडा येथून वळसा मारून, म्हणजेच यू-टर्न घेऊन परत यावे लागते. ही प्रक्रिया अत्यंत वेळखाऊ, आर्थिक भुर्दंड लावणारी आणि मानसिक त्रास देणारी आहे.

या वळसा घेण्याच्या नादात, अनेकदा वाहनचालकांना काही अंतर महामार्गावर विरुद्ध दिशेने प्रवास करावा लागतो. यामुळे जाणीवपूर्वक नाईलाजाने वाहतूक नियमांचे उल्लंघन होते आणि अपघाताचा धोका वाढतो. वाहतूक नियमांचे उल्लंघन करताना दुर्दैवाने अपघात झाल्यास याला जबाबदार कोण असणार, असा संतप्त सवाल परिसरातून विचारला जात आहे.

पलाडी येथील अनेक नागरिक दररोज कामासाठी लाखनी आणि भंडारा येथे ये-जा करतात. तसेच, गावालगत शासकीय आरटीओ कार्यालय, वैद्यकीय महाविद्यालय, ईव्हीएम मशीन मतमोजणी कार्यालय आणि कोका वन्यजीव अभयारण्याकडे जाणारा महत्त्वाचा मार्ग याच गावातून जातो. त्यामुळे या मार्गाचा वापर अनेक लोक करतात, परंतु महामार्गावरील सोयीच्या अभावामुळे सर्वांनाच धोकादायक परिस्थितीतून प्रवास करावा लागतो.

विशेष बाब म्हणजे, निवडणुकीच्या हंगामात मोठमोठे बॅनर लावून स्वतःला जनतेचे प्रतिनिधी म्हणवणारे लोकप्रतिनिधी आणि विरोधी पक्षनेते या गंभीर समस्येकडे सोयीस्करपणे दुर्लक्ष करून गप्प बसले आहेत. ही बाब ग्रामस्थांसाठी एक संशोधनाचा विषय बनली आहे. या गंभीर परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी ग्रामस्थांना आता रस्ता रोको आंदोलन करावे लागेल काय, असा प्रतिप्रश्न गावातील लोक एकमेकांना विचारत आहेत. संबंधित विभाग एखाद्या निष्पाप जीवाचा बळी गेल्यावरच झोपेतून जागा होणार का, असा तिखट परंतु माफक आणि न्यायिक प्रश्न गावातील सुजाण नागरिक उपस्थित करत आहेत.

त्यामुळे, संबंधित विभाग, शासन, प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि विरोधी पक्षनेते यांनी या गंभीर बाबीची त्वरित दखल घेऊन पलाडी येथे महामार्गावर सुरक्षितपणे गावात ये-जा करण्यासाठी योग्य सुविधा (उदा. झेब्रा क्रॉसिंग, उड्डाणपूल किंवा बोगदा) निर्माण करावी, अशी जोरदार मागणी आता जोर धरू लागली आहे. प्रशासनाच्या तत्परतेकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

प्रसार भारती मंत्रालयाचे व्हिजिनरि इंडियन अवॉर्ड सुधीर गोतमारे पुरस्कृत

काटोल ■ प्रशांत पवार

जलसंधारण व स्वनिधीतून ग्राम विकासा करिता सुधीर गोतमारे पुरस्कृत; प्रा.सुधीर गोतमारे यांचेवर अभिनंदनाचा वर्षाव



काटोल : केंद्र सरकार चे प्रसार भारती मंत्रालय नवी दिल्ली व आकाशवाणी तर्फे वर्ष २०२४/२५ चे व्हिजिनरी इंडियन अवॉर्ड आज दिनांक१८मे २०२५ ला आकाशवाणी व ब्रॉडकास्टिंग भवन संसद मार्ग नवी दिल्ली येथे देण्यात आले. यामध्ये देशभरातून आरोग्य, जणसेवा, शिक्षण, व्यवसाय, संगीत, शास्त्रीय गायन, नृत्य, अभिनय, ग्रामविकासीकृत व जलसंवर्धन, महिला सक्ष्मीकरण, अशा विविध १५ कॅटेगिरी मध्येच प्रसार मंत्रालय द्वारा राष्ट्रीय स्तरावर अवार्ड आयोजित करण्यात येते यामध्ये जलसंधारण गाव ग्रामविकास, व स्वनिधी संदर्भात उत्कृष्ट व नावीन्यपूर्ण काम केल्याबद्दल देशातील तीन वक्तीला नामांकित करण्यात आले होते .त्यातून महाराष्ट्रातून राज्याच्या उप राजधानी नागपूर जिल्ह्यातील काटोल तालूक्याचे खुर्सापार येथील माजी सरपंच प्रा. सुधीर गोतमारे यांना या पुरस्कारासाठी निवडण्यात आली होती. या कार्यक्रमाला प्रामुख्याने प्रसारण मंत्रालयाचे वरिष्ठतम अधिकारी देशभरातील विविध विभागांचे मान्यवर मंडळी उपस्थित होते. प्रमुख आयकॉन म्हणून अभिनेत्री पुनम ढील्लन यांच्या हस्ते या पुरस्काराचे वितरण करण्यात आले.

महाराष्ट्रातील काटोल तालुक्यातील खुर्सापार ग्राम पंचायतीचे माजी सरपंचांना जलसंवर्धित गाव विकास व स्वनिधी संदर्भात तसेच ग्रामविकासाचा? नवादृष्टीकोन याकरिता तालुका ते राष्ट्रीय पातळीवरील ?विविध पुरस्कारानी सम्मानित करण्यात आलेआहे. १८मे रोजी केंद्रीय प्रसार भारती मंत्रालय नवी दिल्ली व आकाशवाणी तर्फे सम्मानित करण्यात आले आहे.

या करिता सुधीर गोतमारे यांचे सर्वस्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

ट्रकच्या धडकेत १५ वर्षीय विद्यार्थिनी गंभीर जखमी, चालक पसार: वरठी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल

भंडारा ■ प्रतिनिधी



भंडारा:वरठी- वरठी पोलीस स्टेशन हद्दीत एका भीषण अपघातात १५ वर्षीय सायकलस्वार विद्यार्थिनी गंभीर जखमी झाली असून, ट्रक चालक घटनास्थळावरून पळून गेला आहे. या प्रकरणी वरठी पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, कु. लिनता रामेश्वर साठवणे (वय १५) ही विद्यार्थिनी दिनांक १८/०५/२०२५ रोजी सकाळी ०९:१५ वाजताच्या सुमारास मौजा दाभा येथून भंडारा येथे ट्युशनसाठी सायकलने जात होती. त्याचवेळी एम एच ४० ए.के ३३८५ क्रमांकाचा एक ट्रक भरधाव वेगात, निष्काळजीपणे आणि हलगर्जीपणाने येत होता. या ट्रकच्या चालकाने कुलिंताच्या सायकलला मागून जोरदार धडक दिली.

ही धडक इतकी भीषण होती की कू. ,लिनता सायकलवरून खाली जमिनीवर कोसळली आणि तिला गंभीर दुखापत झाली. अपघातानंतर ट्रक चालकाने घटनास्थळावर थांबून माहिती देण्याऐवजी आपले वाहन तिथेच सोडून पळ काढला.

या घटनेची माहिती मिळताच फिर्यादी गोपाल बळीराम साठवणे (वय ३६, रा. दाभा) यांनी वरठी पोलीस स्टेशनमध्ये तोंडी तक्रार दिली. जखमी लिनता वैद्यकीय अहवाल (श्थ रिपोर्ट) मिळाल्यानंतर, वरठी पोलीस स्टेशनमध्ये अप क्र. १४९/२५ अन्वये ट्रक चालकाविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ कलम २८१, १२५(ब) सह मोटर वाहन कायदा कलम १८४, १३४ (अ) (ब) आणि १८७ नुसार गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

या गुन्ह्याचा पुढील तपास सहाय्यक पोलीस फौजदार ठेंगडी हे करीत आहेत. फरार ट्रक चालकाचा शोध पोलीस घेत आहेत.

शेतकऱ्यांनी परवानाधारक कृषि केंद्रातूनच खत व बियाणे खरेदी करावे

वर्धा ■ प्रतिनिधी

वर्धा : शेतकऱ्यांनी खत, बियाणे व किटकनाशके खरेदी करतांना फसवणूक होऊ नये, यासाठी शासन मान्यता कृषि निविष्ठाचा विक्री परवाना असलेल्या कृषि केंद्रातूनच खरेदी करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

बोगस व बेकायदेशीर बियाणे म्हणजे काय? ज्या बियाण्याच्या उत्पादनास व विक्रीस शासनाची परवाणगी नसते, बियाण्याच्या उत्पन्नासंबंधी मनघडन व खोटे दावे करुन आमिष दाखविण्यात येते. बियाण्याच्या व्यवहारामध्ये शासनमान्य दराचे अधिकृत बिल शेतक-यास दिले जात नाही. बियाण्याच्या पाकिटावर बियाण्याच्या गुणवत्तेचा तपशिल व कोणत्याही तंत्रज्ञानाचा उल्लेख नसतो. बियाण्याच्या परिक्षणपूर्व वापरामुळे जमिनीवर तथा पर्यावरणावर विपरीत परिणाम होऊ शकतो. अनधिकृत बियाणे वापरामुळे जर शेतक-यांचे आर्थिक नुकसान झाले तर त्यासाठी नुकसान भरपाईची हमी शासन किंवा ग्राहक मंच सुध्दा घेऊ शकत नाही, असे बियाणे बोगस व बेकायदेशीर असते.

शेतकऱ्यांनी रासायनिक खते, बियाणे व किटकनाशके खरेदी करतांना अधिकृत व परवानाधारक विक्रेत्याकडूनच खरेदी करावी. यासाठी पक्क्या बिलाचाच आग्रह धरावा. विक्रेता पक्के बिल देण्यास नकार देत असल्यास किंवा इतर कुठलीही शंका तक्रार असल्यास १८००२३३४००० या टोल फ्री क्रमांकावर किंवा ०७१५२-२५००९९ या दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधून तक्रार नोंदवावी. बिलावर खरेदी केलेल्या बियाण्याच्या गुणवत्तेचा संपूर्ण तपशिल नोंदविलेला आहे किंवा नाही याची खात्री करावी.

खरेदी केलेल्या बियाण्याचे पॉकिट सिलबंद, मोहरबंद तथा लेबलसह असल्याची खात्री करावी. बियाण्याच्या उगवणक्षमतेचा अंतिम मुदतीचा दिनांक पाहुनच पॉकीट किंवा बॅग खरेदी करावी.

एमआरपी पेक्षा जास्त किंमतीने विक्री होत असल्यास त्वरीत कृषि विभागाकडे तक्रार नोंदवावी. रासायनिक खत खरेदी करतांना बॅग वरील एमआरपी किंमत बघुनच खरेदी करावी. सद्यास्थितीत जिल्ह्यामध्ये सर्व प्रकारच्या बियाणे, खते मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे. शेतक-यांनी विशिष्ट वाणांचा तुटवडा असल्याच्या अफवांवर विश्वास ठेऊ नये. कोणत्याही अपप्रचारावर विश्वास न ठेवता परवानाधारक विक्रेत्याकडूनच कृषि निविष्ठा खरेदी कराव्यात तसेच काही कंपन्यांकडून दिल्या जाणा-या प्रलोभनावर विश्वास ठेऊ नये.

खरीप हंगाम कालावधीत बाजारामध्ये एकदम उसळणा-या शेतक-यांच्या गर्दीचा व त्यांच्या अज्ञानाचा फायदा घेण्याचा प्रयत्न काही खोडसाळ बियाणे, खत उत्पादक कंपन्या, वितरक व विक्रेते यांच्याकडून फसवणूक होण्याची शक्यता नाकारता येत नाही. जिल्ह्यात जर कोणताही व्यक्ती अथवा संस्था बेकायदेशिर पध्दतीने बोगस बियाणेची, खताची विक्री करतांना आढळल्यास त्यांच्या विरुध्द बियाणे नियंत्रण आदेश १९८३ व रासायनिक खत नियंत्रण आदेश १९८५ अंतर्गत तरतुदीप्रमाणे कार्यवाही केली जाईल. अशा बोगस बियाणे व खते विक्रीची बाब निर्दशनास आल्यास तात्काळ जवळच्या कृषि कार्यालयाशी संपर्क साधावा, असे कृषि विकास अधिकारी संजय बमनोटे यांनी कळविले आहे.

शेतकऱ्यांनी आर.आर.नावाने विकल्या जाणारे ; बोगस बिटी बियाणे खरेदी करु नये

वर्धा ■ प्रतिनिधी



वर्धा : बाजारात किंवा इतर व्यक्तींद्वारे महाशक्ती आर.आर.एचटीबीटी किंवा बी.जी.-३ इत्यादी नावाने बियाणे जिल्ह्यामध्ये येण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे अशा नावाने कोणतेही अनधिकृत कंपनीचे किंवा इतर प्रतिनिधीद्वारे मिळणारे बियाणे पेरणीसाठी खरेदी करु नये, असे आवाहन करण्यात आले आहे.

असे बियाणे कोणत्याही प्रकारची चाचणी न होता बाजारात आलेले असते. त्यामुळे अशा बियाण्यांपासून शेतकऱ्यांचे नुकसान होते. अशा अनधिकृत खरेदी केलेल्या बियाण्यांचे कोणतेही बिल किंवा परवाना नसतो. त्यामुळे शेतकऱ्यांना अशा बोगस बियाण्यांमूळे नुकसान झाल्यास कोणतीही भरपाई शासनामार्फत देण्यात येत नाही.

बियाणे खरेदी करतांना घ्यावयाची काळजी

बियाणे खरेदी करतांना अधिकृत परवाना असणाऱ्या कृषि सेवा केंद्रातून बियाणे खरेदी करावे. बियाणे खरेदीची पावती, पिशवी, टॅग इत्यादी जपून ठेवावी. पॉकीटावर लॉट नंबर, अंतिम मुदत, उगवणशक्ती इत्यादी बाबी तपासून घ्याव्यात. बियाणे पॉकीट योग्य वजनाचे असल्याबाबत खात्री करावी. कोणीही शेतकऱ्यांना असे बोगस बियाणे विक्री करीत असल्यास कृषि विभागाशी संपर्क साधावा. किंवा १८००२३३४००० या टोल फ्री क्रमांकावर किंवा ०७१५२-२५००९९ या दुरध्वनी क्रमांकावर तक्रार नोंदवावी, असे कृषि विकास अधिकारी संजय बमनोटे यांनी कळविले आहे.

श्री संत लटारे महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्य खेनवार परिवारातर्फे महाप्रसादाचे आयोजन

कारंजा (घा.) ■ गौरव सोमकुवर



कारंजा :- शहरातील आराध्य दैवत श्री संत लटारे महाराज यांच्या ६०व्या पुण्यतिथी निमित्याने शहरात सप्तहाः सुरू झाला असून विविध धार्मीक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून उद्या दि. २० तारखेला गोळीबार चौक येथील बस स्थानका समोरील श्री संत लटारे महाराज यांच्या मंदिरात दरवर्षी प्रमाणे मंदिराचे व्यवस्थापक गुलाबसींग खेनवार ,नंदूसिंग खेनवार,रामनसिंग खेनवार,विनोदसिंग खेनवार ,मंगलसिंग खेनवार विशाल खेनवार, मोतिसिंग म्हहले ,गणेश सिंग म्हहले यांच्या परिवारातर्फे महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे सकाळी श्री संत लटारे महाराज यांची पूजा अर्चना आरती सह संगीतमय कार्यक्रम पार पडणार असून दुपारी दोन वाजता पासून महाप्रसादाला सुरवात होणार असून रात्री वाजेपर्यंत महाप्रसाद सुरू राहणार असल्याचे मंदिराचे व्यवस्थापक यांनी सांगितले आहे.

साहुर ग्रामपंचायत करीत आहे जनतेच्या पैशाची उधळण स्पिड ब्रेकर तयार केले एका महिन्याच्या आत फोडून काढले

साहूर ■ शरद वरकड



साहुरः आष्टी तालुक्यातील साहुर हे सर्कलचे गाव असून येथे मोठ्या प्रमाणावर दळण वळण चालू असतात त्यामुळे अपघात होऊ नये म्हणून नागरिकांची मागणी होती की मुख्य ठिकाणी स्पिड ब्रेकर तयार करण्यात यावे त्यामुळे ग्रामपंचायत साहुर च्या वतीने मोठा गाजावाजा करत मुख्य रस्त्यासहीत सर्व गावात स्पिड ब्रेकर तयार करण्यात आले जनतेचे हजारो रुपये खर्च केले आणि चार इंच भिंती टाकल्या सारख्या स्पिड ब्रेकर तयार करण्यात आले त्या स्पिड ब्रेकर मुळे अनेक लोक खाली पडुन जखमी झाले पाहता पाहता अनेकांच्या डोक्याला दवाखान्यातील ड्रेसिंग दिसु लागले त्यामुळे हे स्पिड ब्रेकर अपघात टाळण्यासाठी तयार केले की अपघात होण्यासाठी तयार करण्यात आले ? असे प्रश्न नागरिक सरपंचांना विचारू लागले त्यामुळे ग्रामपंचायतीच्या वतीने सर्व स्पिड ब्रेकर फोडून काढले ही एक जनतेच्या पैशाची उधळण असून जनतेची लूट होत असल्याचे मत नागरिकांनी व्यक्त केले फेरफार असेल तर पाचशे रुपये पावती ,कर पट्टी , पाणी पट्टी,घर टॅक्स पावती,विज कर ,अशा अनेक पद्धतींनी जनतेपासुन वसुली करायची आणि जनतेचाच अपघात करण्यासाठी घातक स्पिड ब्रेकर तयार करायचे आणि अपघात भरपूर झाल्यानंतर पुन्हा स्पिड ब्रेकर फोडून काढायचे यामुळे सरांस जनतेच्या पैशाची उधळण होत असल्याचे दिसून येत असल्याचे मत नागरिकांनी व्यक्त केले हे विशेष.

शेतकऱ्यांनी स्वतःकडील सोयाबीन बियाण्यांचा वापर करावा ; कृषि विभागाचे शेतकऱ्यांना आवाहन

वर्धा ■ प्रतिनिधी



वर्धा : सोयाबीन या पिकाचे सर्वच वाण सरळ वाण आहेत. त्यामुळे दरवर्षी बियाणे बदलाची आवश्यकता नाही. एकदा प्रमाणित बियाणे वापरल्यानंतर त्याच्या उत्पादनातून येणारे बियाणे पुढील २ वर्षापर्यंत वापरता येतात. त्यामुळे शेतकऱ्यांनी स्वतःकडील सोयाबीन बियाण्याचा वापर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

शेतकऱ्यांनी स्वतःकडील बियाणे वापरल्यास उत्पादन खर्च कमी होईल. मागील दोन वर्षात शेतकऱ्यांनी खरेदी केलेल्या प्रमाणित बियाण्यांपासून उत्पादित झालेले सोयाबिन चालुवर्षी बियाणे म्हणुन शेतकरी वापरु शकतात. तसेच ग्रामबिजोत्पादन, पिक प्रात्याक्षिके योजनेंतर्गत शेतकरी समुहांकडून आलेल्या उत्पन्नातून बियाण्यांची निवड करता येते. प्रमाणित बियाण्यांपासून वरील प्रमाणे उत्पादनातून चाळणी करुन चांगल्या प्रतीच्या सोयाबीनची बियाणे म्हणून निवड करावी. बियाणे अत्यंत नाजुक असून त्याचे बाह्य आवरण पातळ असते. त्यामुळे त्याची उगवणक्षमता अबाधित राखण्यासाठी बियाणे हाताळतांना काळजी घ्यावी.

बियाण्यांसाठी साठवणूक करतांना आर्द्रतेचे प्रमाण १० ते १२ टक्क्यापेक्षा जास्त नसावे. साठवणूकीसाठी प्लास्टीक पोत्याचा वापर करु नये. बियाणे साठवतांना त्याची थप्पी ७ फुटापेक्षा जास्त उंच असणार नाही याची काळजी घ्यावी. बियाणे हाताळतांना जास्त प्रमाणात आदळआपट होणार नाही याची दक्षता घ्यावा. प्रति हेक्टरी बियाणे दर ७५ किलोवरुन ५० ते ५५ किलोवर आणण्यासाठी टोकन, वृंद वरंभा सरी पध्दतीने किंवा प्लॅन्टरचा वापर करुन पेरणी करावी.

सोयाबिनची उगवणक्षमता ७० टक्केपक्षा कमी असल्यास उगवण क्षमतेच्या प्रमाणात अधिकचे बियाणे पेरणीसाठी वापरण्यात यावे. ७५ ते १०० मिमी पाऊस झाल्यानंतरच सोयाबिनची पेरणी करावी. बियाण्याची पेरणी ३ ते ४ सेंटीमीटर खोलपर्यंत करावी. पेरणीपुर्वी प्रति किलो बियाण्यास ३ ग्रॅमची प्रत्येकी २०० ते २५० ग्रॅम प्रति १० ते १५ किलो बियाण्यास पेरणीपूर्वी तीन तास अगोदर बिजप्रक्रिया करुन सावलीत वाळवावे व नंतर त्याची पेरणी करावी, असे कृषि विकास अधिकारी संजय बमनोटे यांनी कळविले आहे.

चंद्रशेखर बावनकुळे पालकमंत्र्यांच्या हस्ते आकाश मधूकर बेहनिया जिल्हा युवा पुरस्काराने सन्मानित

काटोल ■ प्रशांत पवार

काटोल : नुकत्याच झालेल्या महाराष्ट दिनाच्या कस्तूरचंद पार्क येथे झालेल्या शासकीय कार्यक्रमात महाराष्ट्राचे महसूलमंत्री व नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते खानगाव (ता. काटोल) येथील आकाश मधूकर बेहनिया (अध्यक्ष - विनज फाऊंडेशन व विश्वव्यापी संस्था) यांना 'जिल्हा युवा पुरस्कार' पुरस्कार' ने सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमात पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते २०२४/२५ वर्षातील 'जिल्हा युवा पुरस्कार' ने सन्मानित करण्यात आले. तीन वर्षांत शहरीच नव्हे, तर ग्रामीण भागात रक्तदान शिबिर, पर्यावरण जागरूकता, आरोग्य शिबिर, महाराष्ट्र व केंद्रशासनाच्या योजनांचा प्रचार व सर्वसामान्य पर्यंत विविध शासकीय योजना, सुविधेचा लाभ मिळवून शासनाला सहकार्य करण्यासाठी तसेच शासकीय योजनेचा प्रचार व प्रसार करण्यासह समाजहित व युवकांसाठी प्रेरणादायी कार्याबद्दल खानगाव (ता. काटोल) येथील आकाश बेहनिया यांना २०२४-२५ वर्षातील जिल्हा युवा पुरस्कार' प्रदान करण्यात आला. या प्रसंगी आकाश बेहनिया सोबत विनज फाऊंडेशनचे चेतन धवड, वीर सिंग, सूरज बागडे, राजेश गाढवे, युवनेश चापले, पंकज खरपुरिया, मंगेश कुबडे व इतर सदस्यांनी पुरस्कार स्वीकारला. याप्रसंगी विभागीय आयुक्त विजयालक्ष्मी बिदरी, मनपा आयुक्त डॉ. अभिजित चौधरी, जिल्हाधिकारी डॉ. विपिन इटनकर, पोलीस आयुक्त रवींद्रकुमार सिंगल, विभागीय क्रीडा उपसंचालक शेखर पाटील, जिल्हा क्रीडा अधिकारी पल्लवी धात्रक उपस्थित होते.

पालकमंत्र्यांच्या हस्ते जिल्हा युवा पुरस्काराने सन्मानित होणं ही माझ्यासाठी गौरवाची बाब आहे. पर्यावरण जागरूकता, आरोग्य शिबिरातून रूग्णांना मदत आणि गरजुंना वेगवेगळ्या योजनेतून लाभ मिळवून देण्याचा माझा छोटासा प्रयत्न असतो. जिल्हा युवा पुरस्कारामुळे मला आणखी ऊर्जा मिळाली आहे. त्यामुळे असेच समाजिक कार्य यापुढेही सुरूच ठेवेन.

आकाश मधूकर बेहनिया
(जिल्हा युवा पुरस्कारथी)
व अध्यक्ष - विनज
फाऊंडेशन, काटोल

जनप्रभात हे दैनिक पत्र मालक, प्रकाशक, मुद्रक : संपादक राहुल ज्ञानेश्वरराव गजरे यांनी रुतुजा प्रिंटर, नवीन आष्टी ता.आष्टी जि.वर्धा ४४२२०२ येथे मुद्रीत करुन साप्ताहिक जनप्रभात कार्यालय, नवीन आष्टी ता.आष्टी जि.वर्धा ४४२२०२ येथे प्रसिध्द केले. भ्रमणध्वनी ७८७५६१३६१९ (या पत्रकातील सर्व माहितीशी संपादक, मालक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद वर्धा न्यायालयांतर्गत) RNI NO : MAHMAR/2022/82242